CMYK




अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड




www.surajyadigital.com शनिवार दि. ३१ डिसेंबर २०२२ ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ९५ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# डुलकीने केला घात; पंतच्या गाडीला झाला अपघात

✔ सुराज्य/नवी दिल्ली


**रिषभ पंत. भारतीय क्रिकेट संघातला स्फोटक फलंदाज अन् सावध यष्टिरक्षक. धोनीच्या जागेवर आलेला एक तरणाबांड क्रिकेटपटू. श्रीलंका दौऱ्यात निवड न झाल्याने नाराज होऊन दिल्लीतून घराकडे निघालेला. भल्यापहाटे उठल्यामुळे झोप नीट न झालेली. त्यात तो स्वत:च गाडी चालवत असलेला. गाडी होती सुसाट. त्यावेळी पहाटेच्या साखरझोपेने पंतवर केले आक्रमण. वाऱ्याच्या वेगाने धावत असताना लागली डुलकी. या डुलकीने केला घात आणि त्याच्या गाडीचा झाला अपघात. काही क्षणातच गाडीने घेतला पेट आणि आगीने घेतले रौद्ररूप. पण समोरून आलेली एस.टी.थांबली अन् ड्रायव्हर खाली उतरून पेटत्या गाडीजवळ आला. काच फोडून बाहेर पडण्याच्या प्रयत्नातील पंतला आगीच्या तावडीतून सोडवले. म्हणून तो वाचला.**

श्रीलंका दौऱ्यासाठी निवड समिती घेणार असलेल्या निर्णयाकडे डोळे लावून बसलेला पंत संघात स्थान न मिळाल्याचे कळताच शुक्रवारी पहाटे दिल्लीतून आपल्या उत्तराखंडमधील घराकडे निघाला होता. श्रीलंका दौऱ्यासाठी संघात स्थान न मिळाल्यामुळे तसा तो नाराजच होता. त्याच नाराजीतून गुरूवारी रात्री झोपी गेलेला पंत शुक्रवारी भल्या पहाटे उठून स्वत:च कार चालवत निघाला. रूरकी बॉर्डरजवळ आल्यानंतर त्याची कार रस्त्यातील दुभाजकाला धडकली. त्यानंतर काहीवेळा पलटी होऊन ती रस्त्याच्या कडेला पडली. त्यानंतर काही क्षणातच कारने पेट घेतला. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या पंतला डेहराडून येथील मॅक्स रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. त्याच्या डोक्याला जबर मार लागला असून पाय फ्रॅक्चर झाला आहे.









## डुलकीमुळे सुटले नियंत्रण

पोलिसांनी पंतचा जबाब नोंदवला असून दिल्लीहून रूरकीला जाताना तो स्वत:च गाडी चालवत होता. प्रवासादरम्यान त्याला एक डुलकी लागली आणि त्याचे कारवरचे नियंत्रण सुटले. त्यामुळे कार दुभाजकाला धडकून काहीवेळा पलटी झाली. त्यानंतर क्षणार्धात कारने पेट घेतला. जीव वाचवण्यासाठी विंडस्क्रिन फोडून पंत बाहेर पडला.

## एसटी ड्रायव्हर बनला देवदूत

पंतच्या गाडीचा अपघात झाला त्यावेळी समोरून येणारी एसटी बस पहिल्यांदा थांबली. एसटी चालक सुशील मान यांनी कारकडे धाव घेतली. त्यावेळी काच फोडून बाहेर पडण्याच्या प्रयत्नातील पंतला सुशील मान याने इतरांच्या मदतीने कारमधून बाहेर काढले. तोपर्यंत एसटीचे वाहक परमजीत यांनी रुग्णवाहिकेला संपर्क साधला. या दोघांच्या प्रसंगावधानामुळे पंतचा जीव वाचला. म्हणून या दोघांचाही स्वातंत्र्यदिनी उत्तराखंड सरकार विशेष सन्मान करणार आहे.

## बसमधील प्रवाशांनी ओळखले

अपघातस्थळी सर्वात पहिल्यांदा थांबलेल्या एसटीचा चालक पंतला कारमधून बाहेर काढण्यासाठी धावला. मात्र तो क्रिकेट पाहत नसल्यामुळे पंतला ओळखत नव्हता. त्या एसटीमधील अन्य प्रवाशांनी पंतला ओळखले. शिवाय पेटत्या कारमधून बाहेर काढल्यानंतर पंतने स्वत:ची ओळख सांगितली. त्यानंतर ही बातमी काही क्षणात जगभर पसरली.

## कार का पेटली?

वेगातील कार इतक्या जोरात दुभाजकाला धडकली की ती काहीवेळा पलटी झाली. त्यात कारची इंधन टाकी फुटली. टाकीतील ज्वालाग्रही इंधन रस्त्यावर सांडले. पलटी होताना झालेल्या घर्षणामुळे ठिणगी पडली. त्यामुळे ज्वालाग्रही इंधनाला आग लागली. त्यातून कारने जागेवरच पेट घेतला. क्षणार्धात आगीने रौद्ररूप घेतले. पुढच्या काही वेळातच कार जळून भस्मसात झाली.

# जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारीपदी कोहिनूरकर

### चंचल पाटील यांची साताऱ्याला बदली

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी व प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील यांची बदली झाली आहे.

त्यांना साताऱ्याच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालकपदी नियुक्ती देण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारीपदी अहमदनगर जिल्हा परिषदेचे सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी एस. एन. कोहिनकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक पदी विभागीय आयुक्त कार्यालयातील सहाय्यक आयुक्त एम. जी. सांगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.




**अखेरचा हा तुला दंडवत... : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या मातोश्री हिराबेन यांचे अखेरचे दर्शन घेतले. मायभूमीत आल्यानंतर आईचे चरण दर्शन घेवून मातृदेवो भव हा आदर्श दाखवून देणारे मोदी यांच्या चेहऱ्यावरील शोक पाहून अखख्वा देश गहिवरून गेला.**

# दहावी व बारावी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

✔ **मुंबई** : दहावी आणि बारावीच्या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने लेखी परीक्षेसाठी अंतिम वेळापत्रक जाहीर केले आहे. बारावीची परीक्षा मंगळवार २१ फेब्रुवारी २०२३ ते मंगळवार २१ मार्च २०२३ या काळात होईल, तर दहावीची परीक्षा गुरुवार २ मार्च २०२३ ते शनिवार २५ मार्च या कालावधीत पार पडतील. यंदा परीक्षा १०० टक्के अभ्यासक्रमांवर होणार आहेत. जादाचा वेळ मिळणार नाही. कोरोनापूर्वी जशा परीक्षा होत होत्या तशाच परीक्षा होणार आहेत.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी, बारावी परीक्षेच्या अनुषंगाने आधीच तयारी सुरू केली होती. कोरोनानंतर नियमित परीक्षा होत असल्याने, परीक्षा केंद्र, बैठक व्यवस्थेची मंडळाकडून चाचपणी करण्यात आली. आठ डिसेंबरपासून पुन्हा जिल्हानिहाय बैठकांचे नियोजन करण्यात आले होते. विभागात दहावी, बारावी परीक्षेसाठी नोंदणी संख्या वाढली आहे. कोरोना प्रादुर्भावामुळे २०२१ ची दहावी, बारावी परीक्षा झाली नव्हती. त्यासाठी अंतर्गत मूल्यमापन गुणदान करण्यात



आले होते. २०२२ मध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव कायम होता. परीक्षा घेण्यात आली, परंतु शाळा तेथे केंद्र, २५ टक्के अभ्यासक्रम कमी, अधिकचा वेळ असे बदल मंडळाने केले होते. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने २०२३ ची परीक्षा २०२० मध्ये झाली त्याप्रमाणे घेण्यासाठी मंडळाने तयारी केली आहे.

शाळा तेथे परीक्षा केंद्र नसणार. त्यामुळे परीक्षेची व्यवस्था पूर्ववत करण्यासाठी मंडळाची धांदल वाढली. शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, परीक्षार्थींची संख्या, विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था, सोयीसुविधांबाबतचा आढावा विभागीय पातळीवर निश्चित करण्यात आला. यंदा दहावी, बारावीची सुमारे वीस नवीन परीक्षा केंद्र वाढू शकतात, असे सांगण्यात येत आहे. दहावीसाठी विभागात पाच जिल्ह्यांत साडेसहाशेपेक्षा अधिक, तर बारावीचे पावणेचारशेपर्यंत परीक्षा केंद्र संख्या असतील असे सांगण्यात येते. जिल्हानिहाय बैठकांमधून परीक्षा केंद्रांचा पुन्हा आढावा घेतला जाणार आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांनी केली रेशन दुकानाची अचानक तपासणी

### ● १० दुकानाची होणार तपासणी; कागदपत्रे तपासली, ग्राहकांची साधला संवाद

✔ **सोलापूर** : सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून वाटप केल्या जाणाऱ्या रेशन दुकानांची जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी शुक्रवारी अचानक तपासणी केली. अशोक चौकातील दुकान न ६४ मध्ये जावून सर्व कागदपत्र, रजिस्टर, धान्याचा स्टॉकची तपासणी करत दुकानात असलेल्या ग्राहकांची संवाद साधत धान्य वेळेत मिळते का याची चौकशी केली.

मात्र जिल्हाधिकाऱ्यांनी अचानक केलेल्या तपासणीमुळे दुकानदारांमध्ये भीतीचे वातावरण आहे. राज्य शासन आणि केंद्र शासनाच्या वतीने सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून दिले जाणारे धान्य रेशन दुकानातातून गोर गरिबांना मिळते का याची तपासणी करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना राज्य शासनाच्या वतीने दिल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षा लांडगे, सहाय्यक पुरवठा अधिकारी विवेक साळुंखे, पुरवठा निरीक्षक अनिल शहापुरे, प्रभाकर घायाळ, रेशन दुकानदार संघाचे जिल्हाध्यक्ष सुनील पेंटर



यांच्या उपस्थितीत अशोक चौकातील दुकान नंबर ६४ दुकान गाठले. दुकानात जाताच जिल्हाधिकाऱ्यांनी प्रथम धान्याची तपासणी करत रजिस्टर मधील धान्याची नोंद आणि

> शासनाच्या सूचनेनुसार शहारातील आणि जिल्ह्यातील प्रत्येकी पाच दुकानाची तपासणी केली जाणार आहे. आज शहरातील एका दुकानाची तपासणी केली. तपासणीमध्ये काही गैरप्रकार आढळून आले नाही. सर्व ऑनलाईन असल्यामुळे गैरप्रकाराला स्थान नाही. दोन दिवसात सर्व दुकानांची अचानक तपासणी केली जाणार आहे.
>
> **- मिलिंद शंभरकर (जिल्हाधिकारी)**

पॉश मशिन मधील नोंदींची तपासणी केली. आयएसओ मानांकन प्रमाणे? दुकानात सर्व सोयी आहेत का? सर्व ग्राहकांच्या माहितीसाठी फलक लावले आहेत का याची तपासणी केली. यावेळी दुकानात धान्य घेण्यासाठी आलेल्या महिला ग्राहकांची संवाद साधत चौकशी केली धान्य वेळेत मिळते का ? जादा पैशाची मागणी होते का ? प्रत्येक महिन्यात धान्य मिळते का? अशी चौकशी देखील जिल्हाधिकाऱ्यांनी केली. शहरातील पाच आणि जिल्ह्यातील पाच असे एकूण दहा दुकानाची तपासणी केली आहे. तपासणीच्या वेळी उचलेले धान्य आणि विक्री केले धान्य यांच्यामध्ये तफावत आढळून आल्यास दुकनदारांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे रेशन दुकानदारांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सिस्टीमने आपल्याला आधीपासूनच विवस्त्र केलंय!

कल्याण
267-58-260

मेन बाजार
299-02-679

### थर्टी फर्स्ट डिसेंबरसाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह ७२५ पोलिसांचा कडक बंदोबस्त

# शहरात ३४ फिक्स पॉइंट्स तर २० ठिकाणी नाकाबंदी

✔ **सोलापूर** : शहर व परिसरात कोरोना संकटाच्या दोन वर्षांनंतर आज (शनिवारी) सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी तरुणाई सज्ज झाली आहे. परंतु आनंदाच्या या क्षणाचा बेरंग होऊ नये, यासाठी पोलिसांकडून बंदोबस्ताची तयारी करण्यात आली आहे.शहरात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह ७२५ पोलिसांचा कडक बंदोबस्त राहणार आहे.




नवीन वर्षाच्या स्वागतासाठी सर्वत्र जय्यत तयारी करण्यात आली आहे.हॉटेल्स, इमारती, ढाबे सजविण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे इमारतींवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. नववर्षाच्या स्वागतावेळी मद्य प्राशन करुन हुल्लडबाजी करणाऱ्यांवर प्रतिबंध घालण्यासाठी पोलिसांकडून चोख बंदोबस्ताची तयारी झाली आहे. शहरात पोलिसांकडून रात्री १२ पर्यंत परवानगी देण्यात आली आहे.त्यासाठी शहरात विविध ३४ ठिकाणी पोलिसांचे फिक्स पॉइंट्स उभारण्यात येत आहेत. पोलीस अधिकारी आणि कर्मचारी नागरिकांची कसून चौकशी करणार आहेत.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची ६ पथके जिल्हाभरात कार्यरत

> आज सरत्या वर्षाला निरोप देण्यात येत असून राज्य उत्पादन शुल्क विभागाची ६ पथके जिल्हाभरात कार्यरत राहणार आहेत. अवैध दारु निर्मिती, विक्री व वाहतुकीवर करडी नजर राहणार असून सर्व हॉटेल ढाब्यांची तपासणी केली जाणार आहे.देशी दारु पिण्यासाठी एक दिवसाच्या परवान्यासाठी दोन तर विदेशी दारुच्या परवान्यासाठी पाच रुपये शुल्क असणार आहे.सर्व वाईनशॉप,बीअर शॉपीमध्ये हे परवाने देण्यात येत आहेत.शहर व जिल्हयासाठी सव्वादोन लाख परवाने वितरित करण्याचे उद्दिष्ट आहे.
>
> **- नितिन धार्मिक, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर**

शिवाय २० ठिकाणी नाकाबंदी राहणार आहे. शहरात येणाऱ्या चारही बाजूंच्या रस्त्यांवर पोलीस तैनात असणार आहेत. पोलीस ब्रीथ ॲनालायझर मशीनद्वारे नागरिकांची मद्य प्राशन केल्याची तपासणी करणार आहेत. शहरात पोलीस आयुक्त डॉ.राजेंद्र माने यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्ह्यात पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त राहणार आहे. शहरात ३ पोलीस उपायुक्त, ३ सहायक पोलीस आयुक्त, १९ पोलीस निरीक्षक, ४ फौजदार-सहायक पोलीस निरीक्षक, ६५८ पोलीस अंमलदार रस्त्यावर राहणार आहेत. त्याचप्रमाणे वाहतूक नियंत्रण शाखेचाही स्वतंत्र पोलीस बंदोबस्त राहणार आहे.

CMYK

# स्वातंत्र्य की गुलामगिरी?...

भारतीय लोकशाहीत सत्ताधीश आणि प्रशासनात काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी हे लोकांचे सेवक असतात. लोकांच्या खिशातील कररूपातून जो पैसा सरकारच्या तिजोरीत जमा होतो, त्यावर सत्ताधीशांची चैन असते तर सरकारी बाबूंना जो गलेलठ्ठ तनखा दिला जातो, तोही जनतेच्या पैशातूनच. त्यामुळे हे घटक लोकांच्या सेवेला बांधील असतात. आज हा सिद्धांत केवळ सांगण्यापुरता झाला आहे. 'सरकारी काम सहा महिने थांब',अशी एक म्हण रूढ झाली होती परंतु तीही आता कालबाह्य झाली असून 'जिसका नोट, उसका पहिले काम', असा सरकारी कामात शिरस्ता झाला आहे. त्याचा प्रत्यय दिल्लीपासून ते गल्लीपर्यंत साऱ्या जनतेला येत आहे. टेबलाखालून अथवा कार्यालयांच्या बाहेर एखाद्या व्हरांड्यात जो कुणी हातावर नोट टिकवेल, त्याचेच अगोदर काम,असा पायंडा पडला असून त्यात सर्वसामान्य जनता भरडली जात आहे. श्रीमंत लोक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या तोंडावर पैसे फेकत आपली कामे पटापट करून घेतात. पैसा न देणारी सामान्य जनता मात्र आपल्या कामासाठी दररोज हेलपाटे मारत असते किंवा रांगेत ताटकत उभी राहात असते. आंदोलनातून कुणी बोंब मारा, कुणी ओरडा. कुणी टीका करा, कुणी निंदा करा. आमच्या वर्तनात काही फरक पडत नाही. असल्या आंदोलनांनी आमच्या केसाला धक्काही लागत नाही, अशी उद्दामपणाची सरकारी बाबूंची भाषा असते. टक्केवारीची कीड सत्तेला लागली असून लाचेचा रोग प्रशासनाला लागला आहे. त्याचे समूळ उच्चाटन होईल का? स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ७५ वर्षे झाली तरी हा प्रश्न अनुत्तरितच आहे. ही सारी पार्श्वभूमी पाहाता



गेल्या दोन महिन्यात सोलापुरातील सरकारी कार्यालयापुढे जे चित्र दिसले,ते कशाचे द्योतक म्हणायचे? सरकारी कार्यालयात आपले काम हेलपाटे मारूनही होत नसेल तर सामान्यांनी काय करावे? यासाठी कुठला नियम नाही. त्यासाठी सामान्यजन सरकारी बाबूंना जाब विचारूच शकत नाहीत. कारण इतकी मुजोरी तिथे बळावलेली असते. मग करणार काय? संताप आणि राग प्रामाणिक व स्वाभिमानी जनतेला सहन होत नाही. अति सहनशीलता विस्फोटाला कारणीभूत ठरते. हा निसर्गनियम आहे. मोजणी कार्यालयाचा उंबरठा सातत्याने झिजवूनही काम होत नाही, असे दिसताच एका वयोवृद्ध गृहस्थाला कार्यालयासमोरच नग्न बसावे लागते. हा प्रकार पाहून सामान्य जनता भडकली आहे. या वयोवृद्धावर एकदाच नाही तर दुसऱ्यांदा हा प्रसंग ओढवला. एकदा अतिवृष्टीचे पैसा मिळाले नाहीत म्हणून हे गृहस्थ दक्षिण तहसील कार्यालयापुढे नगावस्थेत बसून आंदोलन केले. त्यानंतर दक्षिणच्याच भूमी अभिलेख कार्यालयापुढे कपडे काढून बसावे लागले. राजकीय पक्षांच्या आश्रयाखाली असणाऱ्या संघटनांप्रमाणे त्यांचे हे आंदोलन प्रसिद्धीस्टंट नव्हतेच तर त्यात संताप होता.प्रचंड चीड होती. मनात तळतळाट दडलेला होता. नग्न बसल्यानंतर क्षणात त्यांचे काम झाले. त्यांना जे हवे होते, ते देऊन टाकले गेले. म्हणजे नग्न बसल्यावर काम करणार काय? असा प्रश्न आता विचारला जाऊ लागेल. कार्यालयात येणाऱ्या कॉमन पिपलचे काम वेळेवर होत नाही. जो पैसा फेकतो, त्यांची कामे घरापर्यंत नेली जातात, हे वास्तव आहे. कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचा सन्मान झाला पाहिजे. त्याचे काम केव्हा होणार हे त्याला सांगितले पाहिजे. एखादे काम उशिरा होऊ दे. पण त्याच्याशी अधिकारी आणि कर्मचारी यांचा चांगला संवाद असायला हवा. तेच होत नाही. सामान्य जनता हेच आपले आश्रयदाते आहेत, ही भावना लुप्त होत चालली आहे. शेवटी सरकार सरकार म्हणजे कोण? जनताच ना. मग या जनतेशी प्रतारणा करून कसे चालेल? आम्ही सरकारी अधिकारी व कर्मचारी आहोत, हा अहंभाव कशासाठी? मंत्रालयात बसलेले सरकार हे लोकनियुक्त असते. तेव्हा तुम्ही जनतेचे नोकर आहात, याचे भान ठेवा. जनता हीच सरकारी कार्यालयांची खरी मालक आहे. तिथे त्यांचे काम वेळेवर आणि सन्मानजनकच व्हायला हवे. अरे पैसा किती खाता? त्याला काही प्रमाण आहे की नाही? लाजलज्जा सोडून पैसा खात बसणार असाल तर तुमच्यासारखा बेशरम कुणीच नाही. हे विदारक चित्र सबंध देशभरात आहे. तेव्हा ठिगळ कुठे कुठे लावायची? ही चिंता आता सामान्यांनी करत बसूच नये. आपले काम होत नसेल तर उठाव केलाच पाहिजे. या उठावासाठी कुणी पाठीमागे येणार नाही. स्वतःच लढले पाहिजे. सामान्य जनतेच्या उद्विग्नतेचा कडेलोट होत असेल तर हे स्वातंत्र्य आहे की गुलामगिरी? अशी भावना लोकांच्या मनात निर्माण होऊ देऊ नका हीच अपेक्षा.

विदेश

# नवे सरकार; नवी आव्हाने

**आता नव्या सरकारने नेपाळला राजकीय स्थिरता देणे सर्वांत महत्त्वाचे आहे. सध्या नेपाळची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नाही. आर्थिक संकटातून नेपाळला बाहेर काढणे, हे सर्वांत महत्त्वाचे आव्हान नवीन सरकार समोर असेल...**

नेपाळच्या राजकारणात रविवारी घडलेल्या नाट्यात्मक घटना नंतर सोमवारी कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (माओवादी केंद्र) पक्षाचे सर्वेसर्वा पुष्पकमल दहल ऊर्फ प्रचंड (६८) यांनी सोमवारी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. २० नोव्हेंबरला झालेल्या सर्वसाधारण निवडणुकीत प्रचंड यांच्या पक्षाने सर्वांत जुन्या नेपाळी काँग्रेसबरोबर आघाडी केली होती. आघाडीचा धर्म सोडून त्यांनी कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (यूएमएल) आणि अन्य लहान पक्षाशी हातमिळवणी करून पंतप्रधानपद मिळवलं. प्रचंड आणि सीपीएन (यूएमएल) चे नेते आणि माजी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली बऱ्याच प्रमाणात चीनबद्दल सहानुभूती बाळगणारे आहेत. भारताच्या दृष्टीने ही गोष्ट चिंतेची आहे. ओली आता 'किंग मेकर' ठरले आहेत. नेपाळी काँग्रेसची भूमिका सहसा भारताच्या बाजूची असते. सर्वांत जास्त जागांवर विजय मिळवल्यानंतरही नेपाळी काँग्रेसला विरोधी पक्षात बसावे लागणार.

प्रतिनिधी सभेच्या २७५ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत नेपाळी काँग्रेसला ८९, सीपीएन (यूएमएल) ला ७८, प्रचंड यांच्या पक्षाला ३२ जागा मिळाल्या आहेत. माओवादी केंद्रासह पाच पक्षाची आघाडी नेपाळी काँग्रेसने बनवली होती. त्यांना एकूण १३६ जागा मिळाल्या. सरकार बनवण्यासाठी दोन जागा त्यांना कमी पडत होत्या. काही अपक्ष किंवा लहान पक्षाचा पाठिंबा त्यांना सहज मिळाला असता. परंतु, आघाडीच्या रविवारच्या बैठकीत पहिला पंतप्रधान कोण होणार यावर मतभेद झाले. पंतप्रधान असलेल्या शेर बहादूर देऊबा पहिली अडीच वर्षे पंतप्रधान राहतील, असा नेपाळी काँग्रेसचा आग्रह होता. प्रचंड यांना ते मान्य नव्हते. नेपाळी काँग्रेसने त्यांना स्पीकरपदाची ऑफर केली. परंतु, प्रचंड यांना सुरुवातीची अडीच वर्षे पाहिजे होती. प्रचंड यांनी ओली यांचं घर गाठले. इतर लहान पक्षांच्या नेत्यांना बोलावण्यात आले. ओली यांच्या पक्षाला अधिक जागा मिळाल्या असल्या तरी त्याने प्रचंड यांना पहिली अडीच वर्षे दिली. सात राजकीय पक्ष आणि तीन अपक्षांचा प्रचंड यांना पाठिंबा आहे. त्यांच्यासोबत १६९ खासदार असल्याचं सांगण्यात आलं. रविवारी प्रचंड, ओली, राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीचे (आरएसपी) रवी लामिचान, राजेशाहीचे समर्थक राष्ट्रीय प्रजातंत्र पार्टीचे राजेंद्र लिंगडेन इत्यादींनी राष्ट्राध्यक्षांची भेट घेतलेली.



यात आरएसपी हा नवीन पक्ष आहे. त्याला सहा महिनेही झाले नाहीत. रवी लामिचान या पत्रकाराने जुलैत हा पक्ष बनवला. याला २० जागा मिळाली. निश्चितच हा त्यांचा मोठा विजय आहे. टीव्हीवर अँकर म्हणून रवी लोकप्रश्नांना प्राधान्य देत. प्रचारात भ्रष्टाचार दूर करण्याचा पक्षाचा प्रयत्न राहील, असं ते सांगत होते. सर्वांना शिक्षण, आरोग्य सुविधा, कायदा आणि व्यवस्थेत सुधारणा या मुद्द्यांना ते महत्त्व देत. त्यांचे सर्व उमेदवार ५० वर्षांपेक्षा कमी वयाचे होते. आरएसपीचा प्रचार राजकारणाला नवीन दिशा देणारा होता. त्यामुळे, आरएसपी विरोधी पक्ष म्हणून काम करणार, असं लोकांना वाटत होतं. मात्र तसं झालं नाही. आरएसपीने प्रचंड, ओली यांना समर्थन दिल्याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.

प्रचंड तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले आहेत. १९९६ पासून सशस्त्र संघर्ष केल्यानंतर प्रचंड व अन्य माओवादी नेते २००६ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या मदतीने सुरू असलेल्या शांतता प्रक्रियेत सहभागी झाले आणि त्यांनी निवडणुकीच्या राजकारणात प्रवेश केला. २००८ मध्ये पहिल्यांदा थोड्या काळासाठी ते पंतप्रधान झाले. २०१६ मध्ये दुसऱ्यांदा झाले. तेव्हाची परिस्थिती वेगळी होती.

२०१५ मध्ये नेपाळची नवीन राज्यघटना आली. भारताच्या बिहार, उत्तरप्रदेशला लागून असलेल्या तराई येथील मधेशी लोकांनी त्याला विरोध केलेला. नेपाळला समुद्र नसल्याने जवळपास त्यांची सर्व आयात आणि निर्यात बिहार, कोलकात्याहून होते. मध्ये लोकांनी बीरगंज येथे रस्ता अडवला. काही महिने आंदोलन केले. नेपाळात रस्ता रोकोमुळे जीवनावश्यक वस्तूंची प्रचंड टंचाई निर्माण झाली. भारताची आंदोलनाला मदत असल्याचा आरोप तेव्हा झाला.

आता भारताच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रचंड यांचं अभिनंदन केलं. भारत आणि नेपाळमधील मैत्रीचे संबंध अधिक मजबूत करण्यासाठी तुमच्यासोबत मिळून काम करण्याची आशा आहे, असं मोदींनी म्हटले आहे. चीनचा नेपाळवर वाढता प्रभाव आणि प्रचंड पंतप्रधान होणे, या घटना भारताची चिंता वाढविणाऱ्या आहेत.

भारत आणि चीनमध्ये पूर्व लडाख आणि आता अरुणाचल प्रदेशच्या यांगत्से भागात तणाव आहे. पूर्व लडाखच्या गलवान खोऱ्यात तणाव आहे. २०२० मध्ये चिनी सैनिकांच्या हल्ल्यात २० भारतीय जवान शहीद झाले. काही चिनी सैनिकांचाही त्यात मृत्यू झाला. २०२० च्या मे महिन्यात ओली पंतप्रधान असताना नेपाळने त्यांचा नवीन राजकीय नकाशा प्रसिद्ध केला. त्यात भारताच्या लिपुलेख, कालापाणी आणि लिंपियाधुरा परिसराला नेपाळचा भाग दाखवण्यात आला. त्यावरून नवीन वाद सुरू झाला. ऐतिहासिक वस्तुस्थिती आणि पुराव्याला धरून नेपाळचा नवीन नकाशा नाही, असं भारताने स्पष्ट केले. २०२१ च्या मे महिन्यात ओली यांनी प्रतिनिधी सभेत मांडलेला विश्वासदर्शक प्रस्ताव मंजूर झाला नाही. विरोधी पक्षाने बहुमत आपल्या सोबत असल्याचं सांगून देऊबा यांना पंतप्रधान करण्याची राष्ट्राध्यक्ष विद्यादेवी यांना विनंती केली. परंतु राष्ट्राध्यक्षांनी ओलीने आधी केलेल्या विनंतीवरून प्रतिनिधी सभा बरखास्त केली आणि नोव्हेंबरमध्ये निवडणुका घेण्यात येईल, अशी घोषणाही केली. विरोधी पक्ष राष्ट्राध्यक्षाचा निर्णय घटनाविरोधी असल्याचं सांगून सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाने प्रतिनिधी सभा पुनरुज्जीवित करण्याचा व देऊबा यांना पंतप्रधान करण्याचा आदेश दिला. भारतासाठी देऊबा हे पंतप्रधान होणे ही महत्त्वाची गोष्ट होती. तेव्हा प्रचंड नेपाळी काँग्रेस सोबत होते. तेव्हापासून देऊबा सोमवारपर्यंत पंतप्रधान होते.

नेपाळच्या पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्याची सुरुवात सहसा भारतातून होते. त्याला अपवाद प्रचंड यांचा. २००८ मध्ये त्यांनी ही सुरुवात चीनपासून केली. मात्र, २०१६ मध्ये त्यांनी भारतापासून परदेश दौऱ्याची सुरुवात केली. गेल्या काही वर्षांत भारत आणि प्रचंड यांचे संबंधदेखील बरेच सुधारले आहेत. जुलैत भारत दौऱ्यावर असताना प्रचंड जे. पी. नड्डा यांनाही भेटले. तेव्हा, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर पण उपस्थित होते. या बैठकीत भारत आणि नेपाळमध्ये संबंध कसे अधिक मजबूत करता येईल, यावर चर्चा झाली. त्याच्या काही महिने आधीच देऊबा यांनी भाजपाच्या मुख्यालयात भाजपच्या नेत्यांशी चर्चा केली होती.

प्रचंड आणि ओलीसाठी सरकार चालवणे सोपे असणार नाही. सगळ्या घटक पक्षांना एकत्र ठेवणे सोपं नसणार. प्रचंड आणि ओली यांच्यातही काही मुद्द्यांवर मतभेद आहेत. नेपाळला राजकीय स्थिरता देणं सर्वांत महत्त्वाचं आहे. नेपाळची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नाही. आर्थिक संकटातून नेपाळला बाहेर काढणं हे सर्वात महत्त्वाचं काम नवीन सरकार समोर असणार.

**- जतिन देसाई.**

टुडेज ब्लॉग

# फुटबॉलचे अनभिषिक्त सम्राट

**केवळ फुटबॉलमध्येच नाही तर जागतिक क्रीडा क्षेत्रात जिवंतपणीच आख्यायिका बनलेले फुटबॉलचे महान खेळाडू, फुटबॉल सम्राट पेले यांचे गुरुवार दि. २९ ऑक्टोबर रोजी वयाच्या ८२व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले. फुटबॉल सम्राट पेले हे आतापर्यंतचे सर्वश्रेष्ठ फुटबॉलपटू आहेत. केवळ फुटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंसाठीच नव्हे तर सर्वच खेळातील खेळाडूंसाठी देवासमान असलेले पेले यांचे मूळ नाव एड्सन आरंतेस दो नासिमेंतो असे होते मात्र पेले याच नावाने जग त्यांना ओळखत असे आणि त्यांनी हेच नाव अजरामर केले.**

२३ ऑक्टोबर १९४० रोजी ब्राझीलमधील ट्रेस कोराकोसा येथे एका गरीब कृष्णवर्णीय कुटुंबात जन्मलेल्या पेलेंना लहानपणापासून फुटबॉलची आवड होती. त्यांचे वडील डोंनींडि न्हो हे एका स्थानिक क्लबसाठी फुटबॉल खेळायचे. पेले यांनी लहानपणीच आपल्या वडिलांचा खेळ पाहिला होता त्यामुळे त्यांनीही वडिलांप्रमाणेच फुटबॉल खेळण्याचा निश्चिय केला आणि लहान वयातच ते फुटबॉल गाजवू लागले. त्यांचे फुटबॉलमधील कौशल्य पाहून त्यांना वयाच्या १६ व्या वर्षीच सेंटोसा क्लबकडून खेळण्याची संधी मिळाली. हा क्लब ब्राझीलमधील नामांकित क्लब म्हणून ओळखला जातो. या क्लबमध्येच फुटबॉलच्या या हिऱ्याला पैलू पाडण्यात आले. या क्लबकडून पेले यांनी असे प्रदर्शन केले की वयाच्या १६ व्या वर्षीच त्यांचे जगभर नाव झाले. क्लब फुटबॉल गाजवल्याने लवकरच त्यांची ब्राझीलच्या मुख्य संघात निवड करण्यात आली. पेले हे नेहमी फॉरवर्डला खेळत असत. फॉरवर्डला



खेळणाऱ्या पेलेंच्या पायाचे आणि गोलचे नातेच जुळले होते. त्यांच्या पायाशी फुटबॉल आला की त्याला दोन्ही पायांनी खेळवत हरिणाच्या चपळाईने प्रतिपक्षाचा बचाव भेदत त्याला गोलच्या चौकटीत पाठवून देत.

पेले यांनी जेंव्हापासून ब्राझीलच्या राष्ट्रीय संघाकडून खेळायला सुरुवात केली तेंव्हापासून ब्राझील ही फुटबॉलमधील महाशक्ती म्हणून उदयास आली. पेले यांच्यामुळेच ब्राझीलने १९५८, १९६२, १९७० असे तीन विश्वचषक जिंकले. या तिन्ही विश्वचषक स्पर्धेत पेले यांनी अद्वितीय कामगिरी केली. पेले यांच्या नावावर अनेक विक्रम आहेत. पेले यांनी खेळलेल्या ७७ आंतरराष्ट्रीय सामन्यात ९२ गोल केले आहेत. हा एक जागतिक विक्रम आहे, जो अजूनही कोणत्या खेळाडूला मोडता आला नाही. विश्वचषक स्पर्धेतही त्यांनी १४ गोल केले आहेत. त्यांनी त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत एकूण ७७५ हून अधिक गोल केले आहेत. सर्व प्रकारच्या फुटबॉल स्पर्धेत त्यांनी १२८१ गोल केले आहेत. त्यांच्या या कामगिरीची नोंद गिनीज बुक वर्ल्ड रेकॉर्डने देखील घेतली आहे. १९५७ साली आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये पदार्पण करणाऱ्या पेलेंनी आपला अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना १९७७ सालीं खेळला. म्हणजे जवळपास २० वर्ष त्यांनी आंतरराष्ट्रीय फुटबॉलवर हुकूमत गाजवली होती. दोन दशके फुटबॉलवर अधिराज्य गाजवणाऱ्या या महान खेळाडूची २०व्या शतकांतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. ब्रिटनच्या राणींने त्यांना 'सर' हा किताब देऊन त्यांचा गौरव केला असून युनिस्कोने त्यांची शांतता दूत म्हणून नेमणूक केली. ब्राझीलच्या अध्यक्षांनी त्यांचे वर्णन ब्राझीलचा खजिना असे केले होते. फुटबॉलप्रेमी मात्र त्यांना 'द किंग' याच नावाने संबोधित असत. हो ते राजेच होते. केवळ राजे नव्हे तर सम्राट होते. फुटबॉलचे अनभिषिक्त सम्राट. त्यांच्या निधनाने केवळ फुटबॉलवरच नव्हे तर संपूर्ण क्रीडा विश्वावर मोठी शोककळा पसरली आहे. फुटबॉलचे अनभिषिक्त सम्राट पेले यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**- श्याम ठाणेदार, दौंड.**

जन्म हा अखेरचा

## धर्माचारस्थल - ५



गरीबांना यज्ञ करणे शक्य होत नाही. परंतु गरीबातला गरीबदेखील करु शकेल असा यज्ञ म्हणजे 'जपयज्ञ' होय. जपयज्ञ म्हणजे भगवंताचे नामस्मरण. ते केल्याने मनुष्याला अपार पुण्यलाभ होतो. म्हणून आपल्या जिभेवर भगवंताच्या नामची स्थापना करावी. उठताना, बसताना, जेवताना, झोपताना प्रत्येक क्षणी त्याचा नामजप करावा. सांसारिक कार्य करताना भगवन्नामाचा जप सहज करता येतो. नामजपामुळे कामात किंवा कामामुळे नामजपात विघ्न येत नाही. तुम्ही दुसऱ्याशी बोलता बोलता जसे काम करीत असता किंवा काम करता करता जसे दुसऱ्याशी बोलत असता त्याप्रमाणे.

यानंतरचा धर्म आहे 'ध्यान'. ज्याचा नावाचा आपण सतत जप करीत असतो. त्याच्या अलौकिक रुपाचे सतत चिंतन करणे म्हणजे 'ध्यान' होय. भगवंताचे ध्यान केल्याने त्याचे आपल्या हृदयातील अस्तित्व जाणवते. आपण संसाराचे ध्यान केले तर संसार आपल्या आत शिरेल. भगवंताचे ध्यान केले तर भगवंत आपल्या आत शिरेल. प्रत्यक्षात आपल्या जवळ वस्तू नसल्या तरी त्याचे ओझे आपण आपल्या मनात वागवत असतो. घर, शेत, मुले इ. हे सारे आपल्यापासून दूर असतात. तरी आपल्या मनात ओझे होऊन बसलेले असतात. आपण भगवंताचे ध्यान करीत नाही, संसाराचे करतो. **(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## सर्वांचा आवडता ३१ डिसेंबर

जनमानस

३१ डिसेंबर आला ! हे लक्षात आल्यावर आजकाल लहान, तरुण, मुले, मुली व त्यांचे पाल्यही एकमेकांना Happy New Year करण्यास उत्सुक असतात. ३१ ऑगस्ट २०२२ पासून कोरोना कमी झाल्यामुळे शासनाने जनतेवरील लॉकडाऊनचे निर्बंध मुक्त केले आहेत. त्यानंतरचे सण म्हणजे गणेशोत्सव, दसरा, दिवाळी हे सर्वांनी अगदी मुक्तपणे जल्लोषात साजरे केले. परंतु डिसेंबर २०२२ पासून चीनमध्ये पुन्हा कोरोनाने डोके वर काढले आहे. एकट्या चीनमध्ये ३.७ कोटी नागरिक कोरोनाग्रस्त आहेत. हे पाहून भारतीय शासनाने अतिदक्षता घेतली आहे. त्यामुळे आपल्या येथील जनतेवर त्याचा फारसा परिणाम होणार नाही. आता २०२२ साल संपत आले आहे आणि ३१ डिसेंबर साजरा करण्यास प्रत्येक जण सज्ज झाला आहे.





३१ डिसेंबर हा काही सण नाही. तो कुठल्याही जातिधर्मावर आधारित नाही. हा एक उत्सव आहे. हा उत्सव म्हणजे इंग्रजी वर्षाच्या शेवटच्या महिन्यातील शेवटच्या दिवसाचा उत्सव आहे. या दिवशी जुने वर्ष जाऊन नवीन वर्ष येते. म्हणजे दरवर्षी ३१ डिसेंबरच्या रात्री बारा वाजता सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागत होत असते. यावेळी रात्री रस्त्यावर चौका चौकात फटाके उडविले जातात. मोठ मोठ्या आदलींचे बार उडविले जातात व प्रत्येक जण एकमेकांना Happy New Year म्हणत असतो. हा ३१ डिसेंबरचा उत्सव गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून हळूहळू मोठ्या प्रमाणात साजरा होऊ लागला आहे.

३१ डिसेंबर म्हणजे इंग्रजी वर्ष म्हणजे पाश्चिमात्य देशातील वर्ष. मग पाश्चिमात्य लोक त्यांच्या कुठल्याही उत्सवात मध्ये दारू पितात. त्याप्रमाणे या ३१ डिसेंबरच्या उत्सवालाही मद्याची लागण लागली. ३१ डिसेंबर आला म्हटले की मद्याची दुकाने थाटू लागली शेवटी सांगणे एकच! ३१ डिसेंबरच्या या संस्कृतीक, आनंददायी उत्सवाला दारूची जोड लागली. हि वाईट बाब आहे. दारू ही वाईट आहे. ती न पिता ३१ डिसेंबर साजरा करावा व आपला व आपल्या मित्रांसह सर्वांचा आनंद द्विगुणित करावा असे वाटते. आपणाला नवीन इंग्रजी २०२३ या वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

**- अनिल जाधव, बार्शी.**

# हिराबेन यांची भेट झालीच नाही...


**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्री, हिराबेन दामोदरदास मोदी, यांना दि. ३० डिसेंबर २०२२ रोजी, ब्राह्म मुहूर्तावर, पहाटे, ३.३० वाजता देवाज्ञा झाली. आयुष्याची शंभर वर्षे या भूतलावर कार्यरत राहून त्यांनी शुक्रवारी अखेरचा श्वास घेतला आणि आपल्या पुढील प्रवासास त्या मार्गस्थ झाल्या.**

मातृप्रेम हे जगातील सर्वश्रेष्ठ प्रेम आहे. आयुष्यात कष्ट कोणालाच चुकलेले नाहीत. पण हे कष्ट करत असताना आपल्या अपत्यांवरती उत्तम संस्कार करण्याची, त्यांना उत्तम शिक्षण देण्याची आणि सुसंस्कृत करण्याची जबाबदारी ही प्रामुख्याने मातेवर असते, आईवर असते. वडिलांकडून व्यवहार शिकला जातो. संस्कार मात्र आईचेच असतात. यात हिराबेन यांनी आपली जबाबदारी पूर्ण पाडलेली आहे.

लहान असताना आम्हांला सांगितले जाई की, मुलगा कसा असावा. आपत्ये कशी असावीत? त्यातील एक उदाहरण दिले जायचे ते असे. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा, ज्याचा तिन्ही लोकी झेंडा ।' हिराबेन यांना असा पुत्र लाभला आणि त्यांना तो देशास देता आला, ही त्यांच्या उभ्या आयुष्याची फार मोठी जमेची बाजू आहे.

नरेंद्र मोदी यांनी आपल्या राजकीय जीवनात यशाची अनेक शिखरे पादाक्रांत केली. हे सारे आपल्या डोळ्यांनी पाहण्याचे भाग्य आई हिराबेन यांना लाभले. पण याचबरोबर आपण कितीही उच्चपदस्थ झालो असलो तरी, जगात सर्वश्रेष्ठ आहे ते मातेचे चरण, याचा नरेंद्र मोदी यांना विसर पडला नाही. नुसताच विसर पडला नाही, असे नाही, तर त्यांनी संपूर्ण जगासमोर ही भारतीय संस्कृती आपल्या कृतीने सादर केली.

आईसमोर कोणीही मोठा नसतो. आईने सुद्धा आपला मुलगा कितीही मोठा झाला तरी, आपल्या मायेची छायाच त्याला द्यायची असते. हे सुखच जगात मिळणाऱ्या सगळ्या सुखापेक्षा सर्वश्रेष्ठ सुख असते.



मुलाच्या श्रेष्ठत्वाचा अभिमान प्रत्येक आई-वडिलांचा असतोच. पण त्या श्रेष्ठत्वाचे भांडवल करून आपले आयुष्य रूबाबात जगायचे नसते, याचे मूर्तीमंत उदाहरण हिराबेन मोदी यांनी घालून दिलेले आहे. मुलाच्या डोक्यावर आईने ठेवलेला आशीर्वादाचा हात, हेच जगातील सर्वश्रेष्ठ धन असते. हे धन हिराबेन यांनी आपल्या मुलांना भरभरून दिले. आईपाशी स्वतःचे असे देण्यासारखे असे एकमेव धन असते आणि त्याचे वाटप करताना ती कधीही हात आखडून घेत नसते. हे सारे हिराबेन यांचे निमित्ताने जगासमोर आले ते बरे झाले.

७ जुलै २०१९ रोजी आम्ही अहमदाबादला गेलो होतो. हिराबेन मोदी यांना भेटण्यासाठी त्यांच्या घरापर्यंत गेलो होतो. मात्र सुरक्षेच्या कारणास्तव त्यांची आणि आमची प्रत्यक्ष भेट होऊ शकली नाही. यावर्षी आम्ही वयाची शंभर किंवा त्यापेक्षा अधिक वर्षे पूर्ण करणाऱ्या शतायुषी व्यक्तींना भेटण्याचा संकल्प सोडलेला आहे.

आजपर्यंत अशा चार व्यक्तींना आम्ही भेटून आलो आहोत. त्यांचे आशीर्वाद घेतलेले आहेत. त्यांच्या सहवासात काही क्षण घालवलेले आहेत. २०१९ साली राहिलेली हिराबेन मोदी यांची भेट या निमित्ताने घ्यायचीच, यासाठी आमचे प्रयत्न चालू होते. रीतसर परवानगी घेऊन त्यांना भेटावे यासाठीचे नियोजन आम्ही करीत होतो. पण परंतु आमच्या नशिबात ही भेट नव्हती. आमचे हे एक स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. त्याचे दुःख आहे.

आदर्श माता आणि आदर्श पुत्र अशी एक जोडी संपूर्ण जगाने 'याची देही, याची डोळा' पाहिलेली आहे. प्रसार माध्यमांचा योग्य पद्धतीने उपयोग करीत नरेंद्र मोदी यांनी सुद्धा या सर्वोच्च भारतीय संस्कृतीचे दर्शन संपूर्ण जगास करून दिलेले आहे. मातृभक्त नरेंद्र मोदी आणि त्यांचे समस्त बंधू आणि भगिनी यांना जे अतिव दुःख झालेले आहे, त्यात दुःखात आम्ही सहभागी आहोत.

अत्यंत कष्टात आयुष्य काढलेल्या आणि सद्मार्गाने आयुष्य व्यतीत केलेल्या हिराबेन यांना सद्गती मिळणार याबाबत आम्ही निश्चित आहोत. श्रीमती हिराबेन दामोदरदास मोदी यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

**- श्रीनिवास वैद्य, सोलापूर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# मोडनिंबच्या बोरांना हवाय राजाश्रय

# ‘चेकनट’ बोर कोरडवाहू शेतीस वरदान

सुराज्य/शिवाजी हळणवार

सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागात बोर हे फळपीक प्रामुख्याने घेतले जाते. दुष्काळी भागात कोरडवाहू फळशेतीत बोर हे वरदान ठरले आहे. बोर हे कमी खर्चात, कमी मेहनतीचे फळझाड असून, अतिशय महत्त्वाचे कोरडवाहू फळझाड म्हणून बोर लागवडीखालील क्षेत्र दिवसें-दिवस वाढत आहे.

लहानांपासून ते मोठ्यापर्यंत सर्वांनाच कोणते ना कोणते फळ खायला आवडते. थंडीच्या दिवसात एसटी स्टँडवर, रेल्वे स्टेशनवर, बाजारात किंवा कोणत्याही चौकात हमखास दिसणारे फळ म्हणजे बोर. आणि हमखास घरी नेण्याचा खाऊ म्हणजे मोडनिंबची (ता. माढा) बोरे. या बोरांचा गोडवा राज्यभर व देशभर लोकांच्या जिभेवर आहे. मोडनिंब परिसरातील आसपासच्या गावांत शेकडो एकरांवर बोरांची शेती आहे. मोडनिंब बाजारात विक्रीसाठी आणलेल्या बोरांना मोडनिंबची बोरे’ म्हणून ओळख निर्माण झाली आहे. याच बोर उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी सरकारकडून राजाश्रय मिळणे गरजेचे आहे. पौष्टिकतेत बोर हे सफरचंदापेक्षा श्रेष्ठ मानले जाते. क’ जीवनसत्त्वाच्या बाबतीत आवळा, पेरू यानंतर बोरांचाच क्रम लागतो. त्यात कॅल्शियम, फॉस्फरस आणि लोह हे धातूही अधिक प्रमाणात आढळतात. उमराण’, बनारसी’, चमेली’, चेकनट’, ॲपल’ अशी बोरांची काही वाण प्रसिद्ध आहेत आहेत. जसे पुण्याची बाणेरी’, तसेच सोलापूर-मोडनिंबची उमराण’ आणि चेकनट ही बोरे लोकप्रिय आहेत.

### ‘चेकनट’ बोराच असेही एक गाव

सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना बोरांची शेती वरदान ठरत आहे. या जिल्ह्यातील मोडनिंब पसिरातील अरण, ढेकळेवाडी (बैरागवाडी), सोलंकरवाडी, तुळशी, मोडनिंब, आष्टी, पडसाळी, सिद्धेवाडी, तेलंगवाडी, शेटफळ आदी गावांत ५००ते ७०० एकरांवर बोरांची शेती केली जाते. एकट्या ढेकळेवाडी (बैरागवाडी) गावात सुमारे३००एकरांपेक्षा अधिक बोरांची शेती आहे. बोर’ हे गावचे मुख्य पीक आहे. त्यामुळे हे गाव बोरांचे गाव’ म्हणून प्रसिद्ध पावत आहे. बदलते हवामान, भुरी रोग यांमुळे शेतकऱ्यांनी बागा कमी केल्या आहेत. सध्या उमराण’, चमेली’, चेकमेट’ या जातींच्या बोरांचे उत्पादन होत आहे.

### मोडनिंब बोरांना संरक्षणाची गरज

सध्या ॲपल’सारख्या बोरांची नवी जात विकसित झाली आहे. राज्याच्या काही भागात या जातीची लागवड होत आहे. सफरचंदाच्या आकारासारखे हे फळ आहे. त्यामुळे शहरातील स्टॉल विक्रेत्यांकडून, ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात मागणी आहे. परिणामी, मोडनिंब परिसरातील उमराण, चमेली बोरांना याचा मोठा फटका बसत आहे. स्थानिक बाजारात बोरांना योग्य दर मिळत नसल्याची खंत शेतकरी व्यक्त करत आहेत. असंख्य शेतकरी गेल्या चाळीस वर्षांपासून जोपासत असलेल्या बागा मोडून काढत आहेत. या परिसरातील बोर बागा नष्ट होऊ नये, यासाठी कृषी विभागाकडून व कृषी विद्यापीठाकडून बोर उत्पादक शेतकऱ्यांना संरक्षण मिळणे आवश्यक आहे.



### शेतकरी आहेत समाधानी

पूर्वी पाण्याच्या कमतरतेमुळे आमची शेती पडीक असायची. जी कसली जायची ती देखील पावसावर अवलंबून असायची. वीस वर्षांपूर्वी आम्ही बोर लागवडीकडे वळलो. सध्या आमच्याकडे सहा एकरांत चमेली जातीच्या बोरांची शेती आहे. बोरांची विक्री थेट वाशी (मुंबई) मार्केटमध्ये करत असतो. व्यापारी थेट शेतातून माल नेत असतात. त्यामुळे वेळेची बचत होते. व्यापारी थेट बँकेच्या खात्यावर पैसे जमा करतात. आतापर्यंत बोरीतून समाधानकारक उत्पन्न मिळालेले आहे. गतवर्षी खर्च वजा जाता दहा लाखांचे उत्पन्न मिळाले. यंदा पावसामुळे फळधारणेस विलंब झाला. याचा परिणाम उत्पन्नात घट होण्याची शक्यता आहे.

**- कुमार डोंगरे, ढेकळेवाडी**

मी २ एकरांवर बोरांची (चेकमेट जात) लागवड केली आहे. गतवर्षी एका एकरांतून ४०० गोण्या (५० किलो प्रतिगोणी) निघाल्या. पुणे, हैदराबाद, मुंबई बाजारात चांगला दर मिळाला. शेतकरी सध्या विविध अडचणीत सापडला आहे. सरकार इतर पिकांना ज्याप्रमाणे आधारभूत किंमत देते, त्याप्रमाणे बोरांनाही आधारभूत किंमत जाहीर करणे आवश्यक आहे.

**- संतोष मांढरे, ढेकळेवाढी**



## सुयश गुरुकुलची उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाला भेट

**सोलापूर** : अपघात कमी करण्यासाठी शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षेचे धडे सोलापूरच्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून दिले जात आहेत. सुरक्षा कवच’ या संकल्पनेअंतर्गत सुयश गुरुकुल शाळेच्या विद्यार्थ्यांनी रस्ता सुरक्षेचे धडे गिरवले. मनोरंजनात्मक खेळातून वाहतूक नियमांची शिकवण देणारा ’सुरक्षा कवच’ उपक्रम नुकताच सोलापूर आरटीओ मध्ये सुरू करण्यात आला आहे. शाळेच्या मैदानात बागडणारी पावले आज आरटीओच्या ट्रॅक वरती आली. वर्गातली चाचणी परीक्षा माहिती होती. परंतु वाहन चालवण्यासाठी घेण्यात येणारी चाचणी आज पहिल्यांदा विद्यार्थ्यांनी अनुभवली. हेल्मेट घालून दुचाकीवर तर सीट बेल्ट घालून चारचाकी मध्ये बसतानाचा ’सेल्फी पॉईंट’ वरती फोटो घेण्याचा मोह विद्यार्थ्यांना आवरला नाही. यातून रस्ते सुरक्षेचा संदेश त्यांनी आपल्या मोबाईल मध्ये टिपला. विद्यार्थ्यांशी सवांद साधताना उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी रस्ता सुरक्षेचे नियम हे संस्कारांमध्ये, वर्तणुकीमध्ये उतरावयाचे आहेत त्यासाठी सुरक्षा कवच ची स्थापना केली असल्याचे सांगितले. या उपक्रमाच्या सातत्यामुळे हा परिणाम आम्हाला साधता येईल असा विश्वास सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे यांनी याप्रसंगी व्यक्त केला. यावेळी सहायक मोटार वाहन निरीक्षक बाळासाहेब सलगर, मयूर जाधव, अमृता देशमुख, हर्षदा ढेकळे, डॉ. राजकुमार देशमुख, अतुल दराडे, तेजस मखरे यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांसोबत शाळेचे दिपा शिंदे, स्नेहल कुलकर्णी, लक्ष्मीकांत बालगावकर शिक्षक उपस्थित होते.




## जुळे सोलापुरातील किडजी वर्ल्ड स्कूलचे स्नेहसंमेलन जल्लोषात साजरे

**सोलापूर** : जुळे सोलापूरातील किडजी वर्ल्ड स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात व जल्लोषात हुतात्मा स्मृती मंदिर मध्ये पार पडले. गेली दोन वर्ष कोरोनामुळे शाळा बंद होत्या त्यामुळे शैक्षणिक उपक्रम घेता आले नाहीत यावर्षी त्यामुळेच प्रत्येक ठिकाणी शैक्षणिक उपक्रम मोठ्या उत्साहाने घेण्यात आले. किडजी वर्ल्ड स्कूलचे यावर्षी सातवे वार्षिक आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन मेस्टा (एफ) संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माननीय हरीश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. भरतनाट्यमसाँग ने स्नेहसंमेलनाची सुरुवात झाली. ईतीसी हसी ...मेरे सपनोंकि रानी... भूक लगी.. मेरे बंसी बजरिया.. गाण्यावर विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर करून स्मृती मंदिर दणाणून सोडला. चल सर्जा चल राजा...या मराठी गाण्यावर .. तसेच गोलमाल व पुष्पा या सुपरहिट चित्रपटातील गाण्यामुळे पालकांनी आपल्या पाल्याच्या कलेचा आनंद मनमुराद लुटला व चिमुकल्या विद्यार्थ्यांनीही प्रत्येकच गाण्यावर खूपच बहारदार नृत्याविष्कार सादर केला .त्याला पालकांनीही प्रत्येक गाण्यावर प्रचंड टाळ्यांच्या गजरानी दाद दिली. विशेष म्हणजे महिला पालकांनीही आपली कला सादर करून या कार्यक्रमास रंगत आणली. पालकांच्या उस्फूर्त प्रतिसादामुळे हुतात्मा स्मृती मंदिर खचाखच भरले होते. कार्यक्रमासाठी स्कूलच्या प्रिन्सिपल माननीय स्नेहा पाटील , सर्व शिक्षक वर्ग कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. आभार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय संदीप पाटील यांनी मानले.

## काशिबाई दुलंगे यांचे निधन



**अक्कलकोट** : चपळगाव (ता. अक्कलकोट) येथील सौ.काशीबाई गुरण्णा दुलंगे (वय ६५ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी दुपारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर आज शनिवारी सकाळी अकरा वाजता चपळगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्या धार्मिक व मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या. त्यांनी चपळगाव सोसायटीचे संचालकपद भुषविले होते. सामाजिक कार्यकर्ते शिवानंद दुलंगे व सोसायटीचे संचालक कुमार दुलंगे यांच्या त्या मातोश्री होत.

## वळसंग पाणीपुरवठा विहिरीला धुबधुबी नदीचे नाव

### नदी संवाद यात्रेचे यश

**अक्कलकोट** : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त सुरू असलेल्या नदी संवाद यात्रेचे आज वळसंग येथे आगमन झाले. यानिमित्त झालेल्या कार्यक्रमात वळसंग ग्रामपंचायतीने नदीपात्रातील पाणीपुरवठा विहिरींचे नाव धुबधुबी (गुंडगा) विहीर असे ठेवले. यात्रेनिमित्त कुसुर येथे पायल या मुलींचे नाव जलकन्या तर दिंडूर येथे घराचे नाव धुबधुबी आवास असे ठेवण्यात आले त्या अनुषंगाने वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथे ग्रामविकास अधिकारी दस्तगीर नदाफ व सरपंच महानंदा दुधगी यांच्या संकल्पनेतून गुंडगा विहीरींचे धुबधुबी विहीर असे नामकरण करण्यात आले.

याप्रसंगी शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला व जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी गावातून प्रभात फेरी काढली. गट विकास अधिकारी बाळासाहेब वाघ, सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल भोसले, पाटबंधारे विभागाचे उप अभियंता प्रकाश बाबा, शाखा अभियंता राहुल वाकचौरे, कालवा निरीक्षक सिद्धेश्वर नागणसूरे, नदी समन्वयक दिनकर नारायणकर , मंडळ अधिकारी आर. पी. गायकवाड, प्राचार्य विरेश थंळगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके, सरपंच महानंदा दुधगी, ग्राम विकास अधिकारी दस्तगीर नदाफ, तलाठी नयना देशपांडे, कृषी सहाय्यक गुलाब राठोड, डॉ.राजेंद्र पंडीत शंकरलिंग प्रशालेतील शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत नदी साक्षरते विषयी माहिती सांगण्यात आली. त्यानिमित्त शालेय विद्यार्थ्यांच्या रांगोळी स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्याचे प्राचार्य विरेश थंळगे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक तानाजी जमादार यांनी केले. नदी संवाद यात्रा यशस्वी होण्यासाठी शंकरलिंग हायस्कूलचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### २५१ शेतकऱ्यांना ऑन द स्पॉट कोटेशन

## सांगोला, करमाळा, मोहोळ येथे मेळाव्यात ७७३ शेतकऱ्यांचे वीजजोडणीला अर्ज

**सोलापूर** : शेतकऱ्यांना तात्काळ जोडणी देण्यासाठी महावितरण रस्त्यावर उतरले असून, आकडेमुक्त गाव मोहीम राबविण्यासाठी महावितरणचे मुख्य अभियंता सुनील पावडे व वरिष्ठ अभियंते गावपातळीवर मेळावे घेऊन शेतीचे अर्ज स्विकारत आहेत. बिटले, करमाळा व सांगोला येथील मेळाव्यात ७७३ शेतकऱ्यांनी शेती जोडणीकरिता अर्ज केले. त्यातील २५१ शेतकऱ्यांना ‘ऑन द स्पॉट कोटेशन’ देण्यात आले.

शेतीपंपाला अखंडित व पुरेशा दाबाने वीजपुरवठा होण्यासाठी रोहित्रावर असलेला अनाधिकृत भार कमी होणे आवश्यक आहे. मात्र आकडे बहाद्दरांवर कारवाई करुनही आकडे टाकले जात असल्याचे निदर्शनास आल्याने आकडेबहाद्दरांना नवीन वीजजोडणी घेण्यासाठी प्रवृत्त केले जात आहे. बुधवारी बिटले (ता. मोहोळ) येथील वीज कर्मचाऱ्यांनी वीज उपकेंद्राच्या वर्धापन दिनाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनील पावडे, अधीक्षक अभियंता संतोष सांगळे, कार्यकारी अभियंता रमेश राठोड, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्रीकृष्ण वायदंडे तसेच परिसरातील युवानेते अजिंक्यराणा पाटील उपस्थित होते.

यावेळी शेतकऱ्यांना संबोधित करताना मुख्य अभियंता पावडे यांनी आकडेमुक्तीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. शेतकऱ्यांनी आकडे काढून नवीन कनेक्शन घेतल्यास महावितरणकडून चांगल्या सेवेची हमी दिली. तेंव्हा अजिंक्यराणा पाटील यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. या कार्यक्रमात २१३ शेतकऱ्यांचे अर्ज आले. त्यातील १५० कोटेशन तात्काळ देण्यात आले. गुरुवारी मुख्य अभियंता सुनील पावडे यांनी करमाळा उपविभागात मेळावा घेतला. या ठिकाणी १५९ अर्ज प्राप्त झाले. त्यातील १०१ कोटेशन तातडीने दिले. तर दुपारी सांगोला येथे मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात तब्बल ४०१ शेतकऱ्यांनी अर्ज आले. या सर्व शेतकऱ्यांना कोटेशन देण्याचे काम सुरु आहे. दोन्ही ठिकाणी मुख्य अभियंता पावडे यांचेसोबत अधीक्षक अभियंता संतोष सांगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर बार्शीचे कार्यकारी अभियंता सुरेश कुऱ्हाडे यांची करमाळा येथील कार्यक्रमात तर पंढरपूरचे कार्यकारी अभियंता संजय गवळी यांची सांगोला येथील कार्यक्रमास उपस्थिती होती. हे सर्व मेळावे यशस्वी करण्यासाठी उपकार्यकारी अभियंता शितल वनारसे (मोहोळ), सुमीत जाधव (करमाळा), आनंद पवार (सांगोला) यांनी परिश्रम घेतले.

## रिक्षामधील सहप्रवासी महिलेचे दागिने चोरणाऱ्या महिलेस अटक

सुराज्य/सोलापूर

रिक्षा मधील सहप्रवासी महिलेच्या पर्समधील दागिने चोरणाऱ्या महिलेस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. सोलापूर शहरातील जेलरोड पोलीस ठाणे हद्दीतील शांती चौक,पाण्याची टाकी ते मार्केट यार्ड या दरम्यान, दि.११ डिसेंबर रोजी रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास अनुराधा गिरी नरोळे (रा.फलमारी झोपडपट्टी, दाजी पेठ, सोलापूर) या रिक्षा मधुन प्रवास करत होत्या, त्यांचे सोबत त्याच रिक्षात, तीन अनोळखी महिला सहप्रवासी म्हणुन प्रवास करत होत्या.

अनुराधा नरोळे या रिक्षातुन उतरल्यानंतर, त्यांच्या पर्स मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने चोरी झाल्याचे लक्षात आले.त्यावेळी त्यांचा संशय रिक्षा मधील अनोळखी तीन सहप्रवाशी महिला यांच्यावर होता.अनुराधा नरोळे यांनी त्यांच्या पर्समधुन सोन्याचे दागिने चोरी झाल्याबाबत जेलरोड पोलीस ठाणे येथे तक्रार दिली होती.

हा गुन्हा उघडकिस येण्याच्या दृष्टीकोनातुन गुन्हे शाखेकडून समांतर तपास करण्यात येत होता.त्यादृष्टीने गुन्हे शाखेकडील सपोनि. पाटील, सपोनि मोरे व त्याचे पथकातील अंमलदार यांनी शांती चौक पाण्याची टाकी ते मार्केट यार्ड दरम्यान सर्व सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली असता, हा गुन्हा रेकॉर्डवरील महिला आरोपी सुषमा बापूजी चव्हाण (वय-२५, रा.बिस्मिल्ला नगर, मुळेगांव रोड, सोलापूर) हिने व तिचे २ अनोळखी साथीदार महिलांनी केल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर सुषमा चव्हाण हिस चौकशीसाठी ताब्यात घेवून गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे यांचे मार्गदर्शनाखाली कसून तपास केला असता, तिने हा गुन्हा केल्याचे कबुल करून, गुन्ह्यात चोरीस गेलेल्या सोन्याच्या दागिन्या पैकी तिचे वाटणीस आलेले सुमारे १६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने काढून दिले. ते दागिने, स.पो.नि.संदीप पाटील व त्याचे पथकातील अंमलदार विजयकुमार वाळके, श्रीकांत पवार,विद्यासागर मोहिते, गणेश शिंदे व ज्योती लंगोटे यांनी हस्तगत करून तिला पुढील कारवाई कामी जेलरोड पोलीस ठाणे येथे हजर केले आहे.

### आरोग्य विभागाची आढावा बैठक

## काम न करणाऱ्या मक्तेदारांना काळ्या यादीत टाका : आयुक्त

सुराज्य/सोलापूर

महापालिका अंतर्गत असलेल्या पाणीपुरवठा व ड्रेनेज लाईन ची कामे तातडीने पूर्ण करा काम न करणाऱ्या मक्तेदारांना काळ्या यादी टाका आणि उर्वरित कामाचे तातडीने नव्याने टेंडर काढा, असे आदेश महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी दिले आहेत.

महापालिका सार्वजनिक आरोग्य विभागाची आढावा बैठक महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी घेतली. दरम्यान, या संदर्भात त्यांनी पत्रकारांना अधिक माहिती दिली. त्या पुढे म्हणाल्या, महापालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत ड्रेनेज व पाणीपुरवठ्याच्या विविध योजना अंतर्गत चालू असलेल्या तसेच अर्धवट व पूर्ण झालेल्या विविध योजनांच्या कामांची माहिती घेण्यात आली. मुदत संपलेली कामे, रखडलेली कामे याचाही आढावा घेतला. जर एखादा मक्तेदार काम करत नसेल तर त्यांना काळ्या यादी टाका व रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी नव्याने त्वरित टेंडर काढा, असे आदेश दिल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील बहुतांश कामे मार्गी लागले असल्याचे दिसून येते. रखडलेली कामे तातडीने पूर्ण करण्याचेही सांगण्यात आले आहे असे त्यांनी सांगितले.

### विविध योजनांचा अखर्चित निधी परत पाठवा

शासनाकडून पाणीपुरवठा व ड्रेनेज संदर्भातील विविध योजनांचा निधी महापालिकेला प्राप्त झालेला असतो. काम पूर्ण झालेल्या या योजनेचा शिल्लक अखर्चित निधी शासनाकडे पाठवावा, असे शासन आदेश आहेत. त्यानुसार या विभागातील कामनिहाय अखर्चित निधीचा आढावा घ्यावा आणि तो परत पाठविण्याची प्रक्रिया करावी, अशाही सूचना दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

## कोरोनाला घाबरण्याचे कारण नाही; शहर-जिल्ह्यात एकही रूग्ण नाही

### शहर-जिल्ह्यासाठी १५ हजार डोस शिल्लक

सुराज्य/सोलापूर

परदेशात कोरोनाचे रुग्ण वाढत असले तरी, सोलापूर शहर आणि जिल्ह्यात कोरोनाचा एकही रूग्ण नाही. मागिल १५ दिवसात सोलापूर शहर व ग्रामीणमध्ये प्रत्येकी एक रुग्ण आढळला आहे.

दोघेही बरे झाले झाले आहेत. शहर-जिल्ह्यासाठी १५ हजार डोस शिल्लक असल्याचे आरोग्य विभागाने कळवले आहे. कोरोनाच्या पहिल्या दोन लाटांमध्ये शहर आणि जिल्ह्यातील नागरिक भयभीत झाले होते. पहिल्या दोन लाटांमध्ये मृत्युदरात देशातील पहिल्या टॉप-टेन शहरांत सोलापूर होते. त्यावेळी केंद्रीय पथकाने सोलापुरात येऊन



शहरातील परिस्थितीची पाहणी केली होती. त्यानंतर कडक निर्बंध लादण्यात आले होते. त्यानंतर प्रतिबंधित लसीकरण सुरू झाले. कोविशिल्ड, कोवॅक्सिन, कोर्बो वॅक्स लस उपलब्ध झाली आणि कोरोना आटोक्यात आला आणि मृत्युदर देखील कमी झाला. परंतु आता जपान, जर्मनी, चीन व ब्राझीलमध्ये बीएफ-७ व्हेरिएंटचे रुग्ण वाढल्याने नागरिकांमध्ये भीती पसरली आहे. मुंबई आणि पुणे वगळता इतत्र याचे रूग्ण आढळून आले नाहीत. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात सध्या तरी एकही रूग्ण नाही, त्यामुळे कोरोनाला घाबरण्याचे कारण नसल्याचे आरोग्य विभागाने कळवले आहे.

# १ जानेवारीपासून सायं.७ ते ९ पर्यंत मोबाईल, टीव्ही बंद

## अनोख्या उपक्रमात सहभागी होण्याचे पालकांना आवाहन : साठे यांचे आवाहन

सुराज्य/माढा

लक्ष्मण राऊत माढा प्रतिनिधीः- माढा नगरपंचायत आणि प्रियदर्शनी महिला मंडळाच्यावतीने १ जानेवारी २०23 पासून सायंकाळी ७ ते ९ या दोन तासाच्या वेळेत टीव्ही व मोबाईल बंद हा उपक्रम राबवणार असून शहरातील सर्व शैक्षणीक संस्था माढा पोलीस स्टेशन यांच्या सहकार्याने हा उपक्रम सुरू केला.

माढा शहरातील पालकांनी विशेषतः महिलांनी यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन नगराध्यक्षा ॲड मिनलताई साठे यांनी पत्रकार परिषदेत केले आहे.याप्रसंगी उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे पाणीपुरवठा सभापती नितीन साठे नगरसेविका गितांजली देशमुख आदि उपस्थित होते.



याविषयी मिनलताई साठे यांनी कोरोनाच्या नंतर वाढत गेलेली टीव्ही पाहण्याची सवय आणि मोबाईलचा अतिवापर यामुळे शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. सद्यस्थितीत सर्वत्र ऑफलाईन शिक्षण सुरू असल्याने मुलांना मोबाईल आणि टीव्ही पासून लांब ठेवून त्यांचे शैक्षणिक व शारीरिक आरोग्याचे नुकसान टाळण्यासाठी पालकांच्या मदतीने या उपक्रमाचे आयोजन केले असल्याचे त्यांनी सांगितले. पालकांनी ७ ते ९ यावेळेत टीव्ही व मोबाईल बंद ठेवला तर घरातील कुटुंबासमवेतचा कमी झालेल्या संवादात वाढ होईल. घराचे घरपण निर्माण होण्यास मदत होणार आहे.

### शहरवासियांमध्ये जागृतीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन

शहरातील सर्व शैक्षणीक संस्थांमधील विद्यार्थी शिक्षक सर्व नगरसेवक कर्मचारी प्रियदर्शनी महिला मंडळाच्या सर्व सदस्या माता पालक संघातील महिला सदस्या यांचेसह उद्या शनिवारी सकाळी शहरातून जनजागृतीपर रॅली काढण्यात येणार आहे. नगरपंचायतच्या घंटागाडीवरती ऑडियो क्लिप लावली जाणार आहे. प्रभागनिहाय महिला मंडळाच्या बैठका घेऊन जागृती केली जाणार आहे.

यासाठी दररोज सायंकाळी ७ वाजता माढा पोलीस स्टेशन मधून सायरन (भोंगा) वाजेल यावेळी घरातील टीव्ही व मोबाईल बंद होतील. नंतर ९ वाजता पुन्हा सायरन वाजल्यानंतर ज्यांना टीव्ही चालू करावासा वाटतो ते चालू करतील.

सांगली जिल्ह्यातील कडेगाव तालुक्यातील मोहित्यांचे वडगाव या गावी हे उपक्रम सुरू असून याचा चांगला फायदा त्या गावाला झाला आहे.त्यानुसार माढा शहराच्या विकासासाठी हा उपक्रम राबवत असून यामध्ये पालकांनी सहभाग घेत आपले भविष्य उज्वल करावे.

**- ॲड.मिनलताई साठे**



## ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे, एक्स-रे मशीनबाबत आंदोलनाचा इशारा

**सुराज्य/नातेपुते** : नातेपुते ग्रामीण रुग्णालयात सध्या एक्स-रे विभागाचे क्ष किरण तंत्रज्ञ पद रिक्त असल्यामुळे एक्स-रे मशीन ऑपरेट करण्यासाठी त्या ठिकाणी कोणीही नसल्याकारणाने खासगी रुग्णालयात जाऊन एक्स-रे काढावा लागत आहे. त्यामुळे तेथील रिक्त असलेली जागा तात्काळ भरून रुग्णांची होत असलेली गैरसोय दूर करावी अन्यथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्था व शाहू-फुले-आंबेडकर विचार मंच नातेपुतेच्यावतीने आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

नातेपुते ग्रामीण रुग्णालयातील एक्स-रे विभागातील क्ष किरण तज्ञ सेवानिवृत्त झाल्यापासून त्या ठिकाणी अद्याप कोणाचीही नियुक्ती केली नाही. नातेपुते व परिसरातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने या ठिकाणी उपचार घेण्यासाठी येत असतात. त्यामुळे क्षकिरण तंत्रज्ञ रिक्त असलेले पद तात्काळ भरून रुग्णांची होणारी गैरसोय थांबवावी तसेच नातेपुते ग्रामपंचायतचे रूपांतर नगरपंचायत झाले असून ग्रामीण रुग्णालयाचे रूपांतर उपजिल्हा रुग्णालयात करण्यात यावे. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा नातेपुते ग्रामीण रुग्णाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. नम्रता होरा व डॉ. शिवाजी शेंडगे यांना सामाजिक कार्यकर्ते विशाल साळवे, सागर बिचुकले, प्रेम देवकाते, प्रा. अनिल साळवी, अनिल लांडगे, गणेश जाधव, अमित सपकाळ, राजाभाऊ सोनवळ, आकाश लोणारी, मोहित सोरटे, तुषार लंबाते, नाना गायकवाड यांनी दिले.

## मातंग संघर्ष समितीतर्फे सोमवारी महामोर्चा

**सुराज्य/अकलूज** : माळशिरस तालुका मातंग संघर्ष समितीच्यावतीने दि. २ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता अकलूज येथील प्रांत कार्यालयावर विविध मागण्यांसाठी महामोर्चा काढण्यात येणार आहे. तरी यामध्ये मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा, क्रांतिवीर लहुजी साळवे त्यांच्या जयंतीतील १४ नोव्हेंबर रोजी शासकिय महामानवाचे यादी शासन निर्णयामध्ये नाव समाविष्ट करण्यात यावे, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ थेट एक लाख कर्ज योजना सुरू केली आहे. परंतु यातील जाचक अटी रद्द करण्यात याव्यात तसेच पूर्वीचे सर्व महामंडळाचे कर्ज माफ करण्यात यावे, ग्रामपंचायत अंतर्गत असणारे शासकिय गाळे मातंग समाजास देण्याबाबत क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग शिफारस क्रमांक १३ ची अंमलबजावणी करण्यात यावी, माळशिरस तालुक्यातील मागासवर्गीय लोक गायराणात व इतर ठिकाणी अनेक वर्षांपासून राहतात. तरी या लोकांसाठी नवीन गावठाण विस्तार वाढ करून त्यांना गावठाणातील प्लॉट वाटप करण्यात यावे, माळशिरस तालुक्यातील मातंग समाजाच्या अत्याचार पीडित कुटुंबाचे पुनर्वसन करण्यात यावे, चुकीचे पत्र व माहिती देणाऱ्या माळशिरस तालुक्यातील त्या मंडल अधिकारी यांच्यावरती कारवाई करण्यात यावी, क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग अंमलबजावणी व शिफारशी लागू केलेल्या शिफारशींचे अंमलबजावणी करण्यासाठी तालुकास्तरीय सर्व अधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे आयोजन करण्यात यावे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह अकलूज या इमारत बांधण्यासाठी शासकिय जागा उपलब्ध नाही, असे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सोलापूर त्यांच्या पत्रानुसार खाजगी जागा खरेदीची प्रक्रिया तात्काळ राबवून सुसज्ज असे वसतिगृह बांधण्यात यावे, अशा विविध मागण्या यावेळी करण्यात येणार आहेत. तरी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# धूळमुक्त गड्डा यात्रेसाठी विविध उपाययोजना आवश्यक

**▸ होम मैदानावर धूळ प्रदूषण नियंत्रण यंत्र बसवण्याची गरज !**
**▸ देवस्थान समिती व महापालिकेकडून हवे संयुक्त नियोजन !**

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रेदरम्यान होम मैदान परिसरात मोठ्या प्रमाणात धुळीचा त्रास होतो. यामुळे यंदाची गड्डा यात्रा धूळमुक्त व्हावी यासाठी श्री सिद्धेश्वर देवस्थान समिती व महापालिका प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नातून होम मैदान परिसरात अत्याधुनिक धूळ प्रदूषण नियंत्रण यंत्र बसविण्यासह विविध उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता आत्तापासूनच नियोजनाची गरज वर्तवली जात आहे.




सिद्धेश्वर यात्रेनिमित्त देशभरातून लाखो संख्येने भाविक व नागरिक येथे येतात. जानेवारी अखेरपर्यंत मोठ्या प्रमाणात होम मैदान परिसरात लाखो भाविक व नागरिकांची गर्दी पाहायला मिळते. या होम मैदानावर माती असल्याने मोठ्या प्रमाणात धुळीचा त्रास होतो. परिसरात दूरवर हवेत धुळीचे प्रदूषण होते. धुळीमुळे सर्दी, खोकला श्वसनासंदर्भात त्रास होतो. दोन वर्षांपूर्वी यात्रा काळात होम मैदान परिसरात देवस्थान समितीच्या माध्यमातून धूळ उडू नये म्हणून या होम मैदानावर दिवसभरात सकाळी व दुपारी असे दोन वेळा टँकरद्वारे पाणी फवारणीची उपाययोजना केली होती. आताही नियमित पाणी फवारणी करावी.



### धूळ नियंत्रणासाठी पाणी फवारणी सुरू : भोगडे

श्री सिद्धेश्वर यात्राकाळात होम मैदान परिसरात धूळ नियंत्रणासाठी श्री सिद्धेश्वर देवस्थान समितीच्या वतीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतात. प्रत्येक वर्षी यात्राकाळात सुमारे २५ दिवस होम मैदान परिसरात धूळ उडू नये म्हणून रोज टँकरद्वारे पाणी फवारणी करण्यात येते. यावर्षीही पाणी फवारणी करण्यात येईल, अशी माहिती देवस्थान समितीचे विश्वस्त बाळासाहेब भोगडे यांनी दिली.

### यंत्रासाठी विविध कंपन्यांनी पुढाकार घ्यावा

यात्रा काळात होम मैदान परिसरात अत्याधुनिक धूळ प्रदूषण नियंत्रण यंत्र बसविण्यासाठी कंपन्यांनी तसेच संस्थांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. तसेच शहरातील पर्यावरण व अभियांत्रिकी क्षेत्रातील मान्यवरांनी प्रायोगिक तत्त्वावर हातभार लावण्याची अपेक्षा आहे.

यात्राकाळात अत्याधुनिक धूळ प्रदूषण नियंत्रण यंत्र या परिसरात बसविण्याची गरज आहे. या यंत्राद्वारे धुलीकण शोषले जातात आणि शुद्ध हवा बाहेर सोडली जाते. या अत्याधुनिक यंत्राचा यंदा उपयोग केल्यास धुळीवर निश्चितच नियंत्रण मिळवता येईल, असे जाणकारातून बोलले जात आहे.

---

## अ‍ॅट्रॉसिटीच्या नोडल ऑफिसरपदी डॉ. हर्षदीप कांबळे यांची नियुक्ती

**सुराज्य/अकलूज**

शासनाने उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांची समन्वय अधिकारीपदी (नोडल ऑफिसर) नियुक्ती केली आहे.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शासन निर्णयानुसार ही निवड केली आहे.



अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतीबंधक) अधिनियम १९८९ नियम १९९५ च्या नियम ९(१) नुसार अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्टच्या अंमलबजावणीसाठी मंत्रालय स्तरावर समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) यांची नियुक्ती होण्यासाठी नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टिस (एन.डी.एम.जे) या संघटनेचे राज्य महासचिव अ‍ॅड. डॉ. केवल ऊके यांच्या मार्गदर्शनात राज्यसचिव वैभव गीते हे पाठपुरावा करीत होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची तसेच केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, यांची भेट घेऊन निवेदन देऊन चर्चा केली होती.

## महसूलच्या ताब्यातून चोरीला गेलेला वाळूचा टेम्पो पंढरपूर पोलिसांनी पकडला

### दोन आरोपींना अटक

**सुराज्य/पंढरपूर**

पंढरपूर शहरालगत इसबाबी येथून भीमा नदीच्या पात्रातून अवैधरित्या चोरून वाळू उपसा करणारा छोटा टेम्पो महसूल विभागाने धाड टाकून पकडून शासकिय गोदाम येथे ठेवला होता. वाळू माफियाने शासकिय गोदामातून गेट तोडून वाळूचा छोटा टेम्पो चोरून नेला होता. याप्रकरणी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पंढरपूर पोलिसांनी छोटा टेम्पो जप्त केला आहे आणि दोन आरोपींना अटक केली आहे.



तलाठी प्रशांत शिंदे यांनी इसबावी इथून वाळू उपसा करणारा छोटा टेम्पो पकडला होता, त्यावेळी बबलू गडहिरे, गौतम पोळके, अभिजीत सोमवंशी यांनी पलायन केले होते. याप्रकरणी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला होता. यातील आरोपींनी शासकिय गोदाम येथे लावलेला छोटा टेम्पो पाळत ठेवून गोदामाचे गेट उचकटून चोरून नेला होता. याप्रकरणी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पंढरपूर शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अंमलदारांनी वाळू चोरीमध्ये चोरून नेलेल्या टेम्पोचा शोध घेऊन बबलू गडहिरे आणि गौतम पोळके यांना अटक केली आहे. न्यायालयाने या दोघांना चार दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक सचिन हेंबाडे करत आहेत.

## ५६२ कोटींचा अमृत-२ चा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे

### महापालिका आयुक्तांची माहिती

**सुराज्य/सोलापूर** : महापालिकेकडून ५६२ कोटी रुपयांच्या अमृत - २ चा जलवाहिनी कामासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. तो आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे आहे. तेथे मान्यता मिळाल्यानंतर शासन निधीस पुढे मान्यता मिळणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी दिली.

अमृत २ मधून योजनेमुळे शहरातील जलवाहिनी टाकण्याचे काम मार्गी लागणार आहे तर अमृत- १ या ड्रेनेज योजनेअंतर्गत कामे पूर्ण करण्यासाठी मार्च २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत ५६२ कोटी रुपयाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. तो प्रस्ताव आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे गेला आहे. तिथे मान्यता मिळाल्यानंतर शासनाकडून निधीस मान्यता मिळेल. तत्पूर्वी ही कामे तातडीने पूर्ण करण्याच्याही सूचना सार्वजनिक आरोग्य विभागास देण्यात आल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

### समांतर जलवाहिनीच्या निधीसाठी पुन्हा प्रस्ताव पाठविला

उजनी सोलापूर समांतर जलवाहिनी च्या कामासाठी आणखी काही निधी आवश्यक आहे. त्यामुळे आणखी लागणाऱ्या ३८० कोटी निधीसाठी यापूर्वीही पत्र व्यवहार झाला होता. आता पुन्हा नव्याने एक प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी दिली.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,**
**''जीवन भवन'' २३२ मोदी खाना, सोलापूर-४१३००१**
ऑफिस- (०२१७) २३११६९३ फॅक्स- २३१३३८७ E-mail-mjpsolapur@rediffmail.com

**निविदा सुचना क्र.२३ सन २०२२-२०२३**
(GSTशिवाय)

पानीव पाणी पुरवठा योजना, ता. माळशिरस, जि. सोलापूर जल जीवन मिशन कामाची ''ई'' निविदा सुचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडून मागविण्यात येत असून कामाची रक्कम रु. ६,२९,०९,८५७/- (GSTशिवाय) इतक्या रक्कमेच्या ''ई''-निविदा संबधीचा सविस्तर तपशील दि. ०२/०१/२०२३ रोजी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा प्रक्रिया कार्यक्रमांच्या सविस्तर www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

सही/-
**(यु.बी. माशाळे)**
कार्यकारी अभियंता (प्र)

## सदृढ शरिरासाठी व्यायाम आवश्यक : माने

**सुराज्य/अक्कलकोट**

आजची युवा पिढी, युवक हे तासनतास मोबाईल वर विनाकारण वेळ वाया घालवतात. सदृढ शरीर व निर्मळ मनासाठी व्यायामाची गरज आहे, असे प्रतिपादन माजी आमदार दिलीप माने यांनी केले. उत्तर तालुक्यातील तिऱ्हे येथे व्यायाम शाळेचे व इतर योजनेतील विविध विकासकामांचे उदघाटन माजी आमदार दिलीप माने यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी सरपंच नेताजी सुरवसे, चेअरमन भास्कर सुरवसे, बाळासाहेब सुरवसे, अजय सोनटक्के, संदीप सुरवसे, तंटामुक्त अध्यक्ष अरविंद जाधव, गोवर्धन जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. ते पुढे म्हणाले, 'ग्रामीण भागात आज तालमी व शहरी भागात जिम आहेत. मोबाईलच्या वापरामुळे केन्द्र बंद पडत आहे. तरुण युवक व युवती आपल्या स्वत:साठी वेळ काढून व्यायामाची सवय लावून घ्यावे.'

यावेळी अनिल जाधव, आनंद जाधव, मारुती लवटे, संजय राठोड, बबलू सुरवसे, तुकाराम मललाव, गुरुदेव गायकवाड, बालाजी गायकवाड, दादासाहेब मललाव, दिपक मललाव, भगवान राठोड, शंकर जाधव, अनिल गवळी, सचिन सुरवसे, किशोर वाघमारे, शरद आगलावे, शिवाजी काशीद, महादेव सुरवसे, शिवा पिसे, बलभीम शिंदे उपस्थित होते.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**EXTENSION OF PERIOD FOR BID SUBMISSION OF SRM E-TENDER NO. T-21, T-22, T-23 & T-24/2022-23**

The Submission Period & Last Date of Submission for the following SRM E-Tenders is further **extended up to** 06.01.2023 up to 11:00 Hrs. **Date of Opening (Tech. Bid):** 06.01.2023 at 12:00 Hrs (If possible). All other terms & conditions of the E-Tenders will remain unchanged.

| Sr. No. | RFx No. | Name of Work | Tender No. | Estimated Cost & EMD (in Rs.) | Tender Fee (in Rs.) | Work Completion Period | Date of Tender Submission | Date of Technical Bid Opening |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7000025556 | Construction of WBM and providing 20mm premix carpet at 132 kV Substation **Manegaon** Tal. Sangola Dist. Solapur. | T-21/ 2022-23 | Rs. 20,72,093/- <br> Rs. 20,720.93 | 500 + GST | 04 Months | 23.12.2022 (11:00 Hrs) up to 06.01.2023 (11:00 Hrs) | 06.01.2023 (12:00 Hrs) (If possible) |
| 2 | 7000025557 | Construction of R.C.C. sump well & miscellaneous civil works at **132 kV Nimboni Substation,** Tal. Mangalwedha, Dist. Solapur. | T-22/ 2022-23 | Rs. 15,67,817/- <br> Rs. 15,678.17 | 500 + GST | 04 Months | 23.12.2022 (11:00 Hrs) up to 06.01.2023 (11:00 Hrs) | 06.01.2023 (12:00 Hrs) (If possible) |
| 3 | 7000025558 | Providing & laying bituminous approach road from main gate of S/S to switchyard and Main gate to approach road at **132 KV S/Stn. Karmala,** Dist. Solapur. | T-23/ 2022-23 | Rs. 19,39,194/- <br> Rs. 19,391.94 | 500 + GST | 04 Months | 23.12.2022 (11:00 Hrs) up to 06.01.2023 (11:00 Hrs) | 06.01.2023 (12:00 Hrs) (If possible) |
| 4 | 7000025559 | Construction of RCC road at 132/33 kV Substation **Puluj** Tal. Pandharpur Dist. Solapur. | T-24/ 2022-23 | Rs. 24,84,813/- <br> Rs. 24,848.13 | 500 + GST | 04 Months | 23.12.2022 (11:00 Hrs) up to 06.01.2023 (11:00 Hrs) | 06.01.2023 (12:00 Hrs) (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Note:** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal (**https://srmetender.mahatransco.in**).

**Sd/-**
**Executive Engineer (Civil)**
**EHV, CCCM Division, Solapur**

## समाजाला साहित्यिकांची गरज : सुशीलकुमार शिंदे

**सुराज्य/अक्कलकोट**

जीवनामध्ये साहित्य असले म्हणजे मनुष्याच्या ज्ञानात भर पडते, साहित्य टिकविण्यासाठी वाचन संस्कृती वाढली पाहिजे, वाचनाने साहित्यिक घडला जातो, समाजाला साहित्यिकांची गरज मोठ्या प्रमाणात आहे. अक्कलकोट सारख्या ठिकाणी साहित्याची चळवळ आहे ही अभिमानाची गोष्ट आहे. असे प्रतिपादन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे होते.

श्री स्वामी समर्थ देवस्थान ट्रस्टचे पॉलिटेक्निक कॉलेज येथे अक्कलकोट साहित्य परिषदेच्यावतीने माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण व विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. प्रास्ताविक शाखेच्या अध्यक्षा शैलशिल्पा जाधव यांनी केले. यावेळी माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, श्री स्वामी समर्थ




देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रथमेश म्हेत्रे, सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, इस्लामपूरच्या माजी नगराध्यक्षा अरुणादेवी पाटील, मसापचे जिल्हा प्रतिनिधी पदमाकर कुलकर्णी, माजी नगराध्यक्ष अशपाक बळोरगी, माजी जिल्हा परिषद सदस्य मल्लिकार्जुन पाटील, प्राचार्य नागनाथ जेऊरे, प्राचार्य गणपती वाघमोडे आदी उपस्थित होते. यावेळी इस्लामपूरचे ज्येष्ठ साहित्यिक अ‍ॅड. बी. एस. पाटील यांचा शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व रोख रक्कम देऊन शिंदे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. शंकर-सिध्दाराम प्रतिष्ठानचे प्रशिक्षक धनराज भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक युवक पोलीस दलात भरती झाल्यामुळे, अक्कलकोट तालुका शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी चेतन जाधव यांची निवड झाल्याबद्दल, समाजकल्याण विभागामार्फत आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल मृणाल करजगीकर यांचा सत्कार शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन आरती काळे व राजू भोसले यांनी केले. आभार बापूजी निंबाळकर यांनी मानले.

महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: डीआरए-०५२२/प्र.क्र.१८८/२०२२/जाहिरात दिनांक: ३० डिसेंबर, २०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत खालील संवर्गातील पद भरतीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत:-


| जाहिरात क्रमांक | संवर्ग | एकूण पदसंख्या |
|---|---|---|
| १२९/२०२२ | उप संचालक (माहिती), गट-अ (वरिष्ठ) | ०२ |
| १३०/२०२२ | वरिष्ठ सहायक संचालक (माहिती) / जिल्हा माहिती अधिकारी / वरिष्ठ उप संपादक / जनसंपर्क अधिकारी, गट-अ (कनिष्ठ) | १४ |
| १३१/२०२२ | सहायक संचालक (माहिती) / अधीपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने / माहिती अधिकारी, गट-ब | २६ |

२. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरावयाच्या पदांचा संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, प्रवर्गनिहाय तपशील, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, आरक्षण, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे तसेच सविस्तर जाहिरातीचे कृपया अवलोकन करावे.
३. ऑनलाईन अर्ज https://mpsconline.gov.in या संकेतस्थळाद्वारे दिनांक ०२ जानेवारी, २०२३ ते दिनांक २३ जानेवारी, २०२३ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.
४. आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.
ठिकाण : मुंबई. सह सचिव (जाहिरात), महाराष्ट्र लोकसेवा आयोग.



## प्रतीम वाघमारे यांच्या झेलम लघुपटास नऊ पुरस्कार

**नाझरे** : नाझरे (ता.सांगोला) येथील नवयुवक प्रतिम भारत वाघमारे यांच्या झेलम या लघुपटास नऊ अवॉर्ड प्राप्त झाले असून नाझरे व परिसरात सर्वत्र कौतुक केले जात आहे. आटपाडी जी सांगली येथे गदिमा लघुपट महोत्सवात मुक्तेश्वर माडगूळकर व राष्ट्रीय फिल्म विजेते भीमराव गुंडे यांच्या हस्ते प्रतिम वाघमारे यांचा भव्य सत्कार करण्यात आला सदर प्रसंगी उत्कृष्ट दिग्दर्शक उत्कृष्ट संगीत उत्कृष्ट लघुपट व उत्कृष्ट कलाकार म्हणून वाघमारे यांचा सन्मान करण्यात आला तसेच गोवा येथील लघुपट महोत्सवात उत्कृष्ट मराठी लघुपट व उत्कृष्ट कलाकार म्हणून निवड करण्यात आली याशिवाय तमिळनाडू येथे उत्कृष्ट दिग्दर्शक व अयोध्या येथे उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून दुसरा पुरस्कार व कलकत्ता येथे उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून पारितोषिक देण्यात आली आहेत. तसेच इंडो गामा फिल्म महोत्सव हैदराबाद रंगमूर्ती मुंबई उटी लघुपट महोत्सव दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय फिल्म महोत्सव अशा पुरस्कारासाठी झेलम या लघुपटाची निवड करण्यात आली आहे यामुळे प्रतिम भारत वाघमारे यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.



## उत्तम सरगर यांना जिल्हास्तरीय गुणवंत गणित शिक्षक पुरस्कार प्रदान

**सोलापूर** : जिल्हा गणित अध्यापक मंडळ यांचे तर्फे दरवर्षी जिल्हास्तरीय गणित अधिवेशन घेतले जाते .चालू वर्षी जिल्हास्तरीय गणित अधिवेशन मंगळवार दिनांक २% डिसेंबर २०२२ रोजी अग्रसेन भवन ,आसरा चौक, सोलापूर येथे घेण्यात आले. या अधिवेशनामध्ये गणित विषयात उल्लेखनीय कार्य केलेल्या शिक्षकांना गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात येतो. त्यामध्ये २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील श्री उत्तम चंद्रभान सरगर यांना मा. श्रीमती सुलभा वटारे(माध्यमिक शिक्षणाधिकारी सोलापूर) मा. श्री तानाजी माने (अध्यक्ष मुख्याध्यापक संघ) डॉक्टर ह.ना. जगताप (शिक्षणतज्ञ) मल्हारी बनसोडे (गटशिक्षण अधिकारी दक्षिण सोलापूर )इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत गुणवंत गणित शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी सागोल तालुका गणित अध्यापक मंडळाचे अध्यक्ष शिवाजी चौगुले सर, सचिव आनंद खंडागळे, परीक्षा प्रमुख नदाफ, माजी जिल्हाअध्यक्ष निलकंठ लिंगे, सचिव मा.लोखंडे सर तसेच तालुक्यातील गणित विषय शिक्षक, सरगर सराचे कुटुंबिय उपस्थित होते. सरगर सरांचे वझरे गावातील मित्र दादासाहेब वाघमोडे, दिलीप सरगर, माजी सरपंच महादेव पवार, माजी उपसरपंच सचिन कोकरे, आनंदा कोकरे सुभाष कोकरे, बंडू कोकरे, विजय कोटी, स्वप्नील रेड्डी, सिध्देश्वर पाटील, सदाशिव वाघमोडे, संजय वाघमाडे, दत्ता सरगर, महादेव सरगर, सागर सरगर, यशवंत खरात, सचिन बनकर, खंडागळे, प्रदीप धुकटे उपस्थित होते.

## कर्मचारी महासंघाच्या तालुकाध्यक्षपदी सचिन येडशे यांची निवड

**उत्तर सोलापूर** : महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या मंगळवेढा तालुकाध्यक्षपदी सचिन येडशे, सरचिटणीस पदी रविकिरण आवताडे यांची अविरोध निवड करण्यात आली. पंचायत समिती मंगळवेढा येथे जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाची बैठक जिल्हाध्यक्ष राजेश देशपांडे यांच्या अध्क्षतेखाली घेण्यात आली. यावेळी कार्याध्यक्ष पदी ग्रामसेविका तांबोळी, उपाध्यक्ष कृषि अधिकारी मधुकर डोरले, महिला उपाध्यक्ष अंगणवाडी पर्यवेक्षिका अनुराधा शिंदे, सहसचिव- ग्रामसेवक दामाजी पवार, जिल्हा कार्यकारिणी प्रतिनिधी - कनिष्ठ प्रशासन अधिकारी रोहिणी थोरात, कोषध्यक्ष - स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक प्रथमेश कवडे , प्रसिध्दी प्रमुख - महेश कुलकर्णी, संघटक - बब्रुवान माने, विजय कुंभार, राखी जाधव,



शिवानंद माने, सुभाष राठोड, तालुका सल्लागार समिती - सहाय्यक प्रशासन अधिकारी ईमाम मुलाणी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी रामलिंग सरवदे, किरण लालबोन्द्रे,कविता भानवसे बाळासाहेब बाबर, पी.के लवटे, राहुल मिसाळ, एस एन नरळे,गोरख जगताप यांची निवड करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार पंचायत समिती गटविकास अधिकारी शिवाजी पाटील, जिल्हा महासंघाचे दिनेश बनसोडे, राजेश देशपांडे, सचिन मायनाळ,आनंद साठे , प्रमोद धावड, श्रीकांत रणखांबे, सुरेश राठोड, दिव्यांग कर्मचारी संघटनेचे लक्ष्मण वंजारी,लिपिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश गोडसे,गुरू जाधव,प्रफुल्ल माळी,सुनंदा सुरवसे,सुरेखा जवळकर, ग्रामसेवक संघटनेचे गोरख जगताप, संजय शिंदे, जोंधळे , ईमाम मुलाणी, किरण लालबोन्द्रे , रोहिणी थोरात, रामलिंग सरवदे, चंद्रकांत पवार, विष्णू सानेपागुल उपस्थित सत्कार करण्यात आला.

## सोलापूर जिल्हा उद्योग केंद्रामार्फत ब्युटी थेरपी प्रशिक्षण कार्यक्रम

**पंढरपूर** : महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, व्दारा जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर मार्फत महिला-मुलींकरिता ब्युटी थेरपी अँड हेअर स्टाईल प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि. ५ जानेवारी पासून करण्यात आले आहे.या ३० दिवसीय प्रशिक्षणामध्ये ब्युटी पार्लर विषयांस अनुसरून विविध उद्योग संधी, अ प्रकार, स्कीन केअर व हेअर स्टाईल प्रकार, साडी ड्रिपींग, मेकअप, आयुर्वेदिक ट्रिटमेंट, स्पा सेंटर, ब्लिचिंग, व्हॅक्सिन, मशनिरीचे प्रकार, गॅलव्होनिक, कॉस्मेटिकस इत्यादी अशा विषयासंदर्भात थेअरी व प्रॅक्टीकलसह मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शासकिय कर्ज योजना, जिल्हा उद्योग केंद्राचे पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना, मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती योजनेची माहिती, उद्योगांचे रजिस्ट्रेशन, बँकेची भूमिका, प्रकल्प अहवाल, बाजारपेठ सर्वेक्षण, मार्केटिंग, संभाषण कौशल्य, व्यक्तिमत्व विकास यांचे मार्गदर्शन तज्ञांमार्फत मिळेल. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्यास प्रमाणपत्र मिळेल. प्रशिक्षणात भाग घेण्यास शिक्षण कमीत कमी ८ वी पास, वयोमर्यादा जास्तीत जास्त ५० वर्षे पर्यंत असावे. अधिक माहिती व प्रवेशासाठी पंचायत समिती खादी व ग्रामोद्योग विभाग, पंढरपूर येथे संपर्क साधावा. महिला व युवतींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका प्रकल्प समन्वयक अमृता पालवे ( ७९७२२८९२६५) यांनी केले आहे.

# प्रत्येकाने आपले हक्क व अधिकार जाणून घ्यावेत : सह.दिवाणी न्यायाधीश कुंभार

सुराज्य/पंढरपूर

**दैनंदिन जीवनात आपण अनेक गोष्टींची खरेदी करत असतो. परंतु आपल्याला ग्राहक म्हणून आपले अधिकार माहित असतात का ? ग्राहकांना त्यांचे प्रत्येक अधिकार माहिती नसल्यामुळे त्यांची अनेकदा फसवणूक होते. अशा प्रकारची फसवणूक होऊ नये यासाठी प्रत्येकाने आपले हक्क व अधिकारी जाणून घ्यावेत असे सह. दिवाणी न्यायाधीश आर.जी.कुंभार यांनी सांगितले.**



तहसील कार्यालय, पंढरपूर, तालुका विधी सेवा समिती, पंढरपूर व आखिल भारतीय ग्राहक पंचायत, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राहक परीसंवाद व ग्राहक मेळावा या कार्यक्रमाचे पंचायत समिती, शेतकी भवन, पंढरपूर येथे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास तहसीलदार सुशील बेल्हेकर, अप्पर तहसीलदार समाधान घुटुकडे, पुरवठा निरिक्षण अधिकारी एस.ए.कन्हेरे, बार असोसिएशनचे तालुका अध्यक्ष डॉ.भगवान मुळे, पुरवठा निरिक्षक सदानंद नाईक, आखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे प्रांता कोषाध्यक्ष विनोद भरते, जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास उपस्थित होते. यावेळी न्यायाधीश कुंभार म्हणाल्या, आजच्या काळात आपण सर्वजण मोठ्या प्रमाणात ऑनलाईन वस्तू खरेदी करतो. ऑनलाइन विक्रेत्यांकडूनही ग्राहकांची फसवणूक होते. अशा वेळेस ग्राहकाला कायदेशीर कोणते अधिकार आणि हक्क प्राप्त झालेले आहेत. हे ग्राहकाला माहिती असणं खूप आवश्यक आहे. ग्राहक म्हणून मिळालेले हक्क तुम्हाला माहिती असल्यास आपली फसवणूक होणार नाही. असे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच नागरिकांना महिलांविषयी, बालकांविषयी, कौटुंबिक हिंसाचार यासह अन्य कायद्याची माहिती व्हावी यासाठी विधी सेवा समितीच्यावतीने विविध ठिकाणी कायदेविषयक जनजागृती शिबीराचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे नागरिकांना या शिबिरातून कायदेविषयक माहिती मिळण्यास मदत झाली असल्याचे न्यायाधीश कुंभार यांनी सांगितले. ग्राहक हितासाठी असणा-या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर सर्वच शासन यंत्रणांनी भर दिला आहे. ग्राहकास त्याचे हक्क व कर्तव्य याची जाणीव करुन देण्यासाठी ग्राहक संरक्षण कक्ष, ग्राहक पंचायत तसेच ग्राहक व व्यापारी संघटनाही कार्यरत आहेत. तरी पण ग्राहकाची अडवणूक व फसवणूक होणार नाही यासाठी ग्राहकाबरोबरच समाजातील प्रत्येकांनी पुढे येणे गरजचे आहे. ग्राहक पंचायत संघटना ग्राहकांना जागृत करण्याचे काम करतात असे तहसिलदार बेल्हेकर यांनी यावेळी सांगितले.

ग्राहकांना न्याय मिळवून देण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत कटिबध्द असून, ग्राहकांनी जागरूकपणे होणाऱ्या शोषणाविरुद्ध संघर्ष करावा. ग्राहक संरक्षण कायद्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या कायद्याची अंमलबजावणी प्रभावी होण्यासाठी शासकिय यंत्रणा, सामाजिक संस्था व युवकांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन ग्राहक पंचायतीच्या वतीने करण्यात आले. यावेळी आखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे प्रांता कोषाध्यक्ष विनोद भरते, जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास, दिपक इरकल तसेच बार असोसिएशनचे तालुका अध्यक्ष ड.भगवान मुळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पुरवठा निरिक्षक सदानंद नाईक यांनी केले. यावेळी आखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी, विविध विभागाचे अधिकारी तसेच रेशन दुकानदार व नागरिक मोठया उपस्थित होते.



## घोळसगाव सरपंचासह नूतन सदस्यांचा काँग्रेस कार्यालयात सत्कार

**अक्कलकोट** : घोळसगाव ग्रामपंचायतीवर काँग्रेसची सत्ता आल्यानंतर अक्कलकोट काँग्रेस कार्यालयात नूतन सरपंच व सदस्यांचा सत्कार माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रथमेश म्हेत्रे, व्यंकटराव पाटील, संजय होळे, संजय पाटील, परमेश्वर आलुरे यांच्या सह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अक्कलकोट तालुक्यातील राजकिय दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या घोळसगाव ग्रामपंचायतीवर काँग्रेसचे माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली व अक्कलकोट पंचायत समितीचे उपसभापती इरण्णा आलुरे यांच्या नेतृत्वाखाली महात्मा बसवेश्वर पॅनलने निर्विवाद वर्चस्व मिळविले आहे. माजी सरपंच व्यंकटराव पाटील, माजी उपसरपंच सिध्दाराम किवडे, परमेश्वर आलुरे, महालिंग शिरगुरे, इरसिंगप्पा पडसलगे, मल्लिनाथ होळे, रेवणसिध्द किवडे, बाळू घोडके, अशोक गायकवाड, अजय गायकवाड यांच्या गटाने आपला झेंडा फडकविला.

जनतेतून सरपंचपदी राजशेखर मल्लिनाथ किवडे व ९ पैकी ३ सदस्य विजयी झाले आहेत.तर घोळसगावमध्ये तिरंगी लढत झाली.

त्यांच्या विरोधातील दोन्ही ही गटाला प्रत्येकी तीन जागा मिळाल्या. सरपंचपद सर्वसाधारण साठी आरक्षित असलेल्या जागेवर महात्मा बसवेश्वर पॅनलचे सरपंच राजशेखर मल्लिनाथ किवडे हे ३९१ मताधिक्याने विजयी होवून सरपंचपदी विराजमान झाले.

महात्मा बसवेश्वर पॅनलचे विजयी सदस्य आणि मते पुढीलप्रमाणेः सरपंच राजशेखर मल्लिनाथ किवडे (८६१), व इतर सर्व सदस्य- लक्ष्मण दत्तात्रय आलुरे (३०५), ताराबाई धर्मा गायकवाड (३८१),व सुतार शाहीनरजा भागवत (२५९) हे विजयी झाले आहेत.

निवडून आलेल्या नूतन सरपंच राजशेखर किवडे व सदस्यांचा सत्कार इरण्णा आलुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व उपसभापती सोनाबाई आलुरे यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

## जिल्ह्यातील सर्व शिक्षकेतर बांधवांनी अधिवेशनात सहभागी व्हावे : सुर्वे

**अक्कलकोट** : महाराष्ट्र राज्य शिक्षकेत्तर महामंडळाचे ५० वे सुवर्ण महोत्सवी राज्य अधिवेशनाची जय्यत तयारी सुरू झाली असून या अधिवेशनात शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नावर चर्चा होणार आहे. म्हणून सोलापूर जिल्ह्यातील सर्व शिक्षकेत्तर बांधवांनी अधिवेशनात सहभागी व्हावे असे आवाहन सोलापूर जिल्हा शिक्षकेत्तर संघटनेचे जिल्हाअध्यक्ष रविकांत सुर्वे,जिल्हासचिव मुस्ताक शेतसंदी व अक्कलकोट शिक्षकेत्तर महामंडळाचे तालुकाअध्यक्ष चेतन जाधव यांनी केले.

शिक्षकेत्तर संघटनाचे राज्य महामंडळाचे ५० वे सुवर्ण महोत्सवी राज्यअधिवेशन सांगली येथील कर्नाळा रोडवरील धनंजय गार्डन येथे दिनांक ८ जानेवारी २०२३ रोजी संपन्न होणार आहे.या अधिवेशनाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्याचे शिक्षणमंत्री दिपक केसरकर, कामगारमंत्री सुरेश खाडे, सर्व शिक्षकआमदार व पदवीधर आमदार उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनामध्ये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अतिशय महत्त्वाच्या प्रश्नवर चर्चा होणार आहे. त्यामध्ये आकृतीबंध, शिक्षकांची नवीन भरती सुरू करणे, आश्वासित प्रगती योजना, दहा-वीस-तीस लागू करणे, शिक्षकेत्तरना पदोन्नती संबंधित चर्चा करून ठराव पारित करण्यात येणार आहे. सदर अधिवेशन यशस्वी करण्यासाठी राज्य सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर, राज्यअध्यक्ष अनिल माने व राज्य संघटनेचे सर्व पदाधिकारी प्रयत्नशील आहेत. या अधिवेशनास सोलापूर जिल्ह्यातील सर्व शिक्षकेतर बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सोलापूर जिल्हा शिक्षकेत्तर संघटनेचे जिल्हाअध्यक्ष सुर्वे, जिल्हासचिव शेतसंदी, राज्य उपाध्यक्ष श्रीशैल तळवार, जिल्हा सदस्य विकास तळवार व अक्कलकोट शिक्षकेत्तर महामंडळाचे तालुकाध्यक्ष चेतन जाधव यांनी केले आहे.

## श्री गुरुसिद्धप्पा महाराज मंदिर कळसारोहण

**सोलापूरः** दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील श्री गुरुसिद्धप्पा महाराज मंदिर कळसारोहण निमित्त शनिवार दि.३१ डिसेंबर पासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे शनिवार दि.३१ डिसेंबर ते ३ जानेवारी पर्यंत उंबराणी येथील वेदमूर्ती श्री मुगेद्रस्वामी हे शिवमहिमा या विषयावर प्रवचन देणार आहेत.




## जलसाक्षरता ही काळाची गरज : गटविकास अधिकारी वाघ

**अक्कलकोट** : वाढत्या औद्योगीकरण व नागरिकारणामुळे तसेच पाण्यावरील ताण दिवसेंदिवस वाढत असून आपल्या भागातील नदी ची जोपासना आपल्या मार्फत योग्य पद्धतीने होत नसल्याने भविष्यात होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी योग्य काळजी घेण्याची व जलसाक्षरता काळाची गरज असल्याचे प्रतिपादन दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ यांनी केले.आचेगांव तालुका दक्षिण सोलापूर येथे आयोजित धाबधुबी नदी संवाद यात्रा निमित्ताने ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन सरपंच विश्रांती शावरसिध्द पाटील या होत्या. यावेळी नदी समन्वयक दिनकर नारायणकर,शाखा अभियंता राहुल वाघचौरे, भाजप अनु. जाती तालुकाध्यक्ष बलवान गोतसुर्वे, कालवा निरीक्षक राजेंद्र गायकवाड, भारत कांबळे, मुख्याध्यापक कोळी,महादेव पाटील, इरफान पटेल, ग्रामसेवक रमेश गायकवाड, तलाठी ठेंगील, पोलीस पाटील प्यारन मुल्ला, शावरसिध्द जळगोंडर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक दिनकर नारायणकर यांनी केले. सर्वप्रथम मान्यवरांचे सत्कार व स्वागत सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते करण्यात आले. प्रस्ताविकात नारायणकर यांनी वळसंग येथे पाणी संवर्धनाबाबत राबवलेल्या उपाययोजना बाबत माहिती दिली.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य रफिक मुल्ला, मलकारी कोरे, रायप्पा जळगोंडर, नागप्पा कांबळे, ग्रामपंचायत सदस्या श्रीम मंगल गोतसुर्वे, गौतमी गोतसुर्वे, जयश्री खांडेकर, सावित्री कांबळे, शिलेणी, जिप मराठी शाळेचे शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थी, ग्रामपंचायत कर्मचारी, गावकरी आदी मोठया संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार बलवान गोतसुर्वे यांनी केले.

## क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव : देशमुख

सुराज्य/वेळापूर



क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो, त्यांची बौध्दिक व शारीरिक वाढ होण्यास मदत होते. या बालवयातच मुलांवर संस्कार होण्याबरोबरच या विद्यार्थ्यांना विविध खेळांमध्ये नैपुण्य मिळवण्यासाठी या स्पर्धातून खेळण्याची मोठी संधी मिळते. यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धे मधून भाग घ्यावा व उज्वल यश संपादन करावे, असे आवाहन माळशिरस तालुका गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख यांनी केले.

ते जि. प. शाळा पिसेवाडी यांच्या वतीने जि.प. शाळा तालुका लहान व मोठा गट मुले खो-खो क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पुजन होउन उपस्थित सर्व मान्यवरांचा जि.प.शाळा पिसेवाडी यांच्यावतिने सत्कार करण्यात आला. पिसेवाडी ग्रामपंचायत नूतन सरपंच मोहन भाकरे व गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख यांच्या हस्ते खो-खो मैदानाचे पूजन करून टॉस उडून पहिल्या कचरेवाडी विरुद्ध पिलीव खो खो मुले सामन्याचे उद्घाटन करण्यात आले.

या क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला पिसेवाडी ग्रामपंचायतचे नूतन सरपंच मोहन भाकरे, गट शिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, शिक्षण विस्तार अधिकारी हर्षवर्धन नाचणे, संग्राम सिंह मोहिते पाटील दूध संस्थेचे चेअरमन रामचंद्र पिसे, पद्मजादेवी मोहिते पाटील, दूध संस्थेचे चेअरमन भागवत पिसे, ह.भ.प. महादेव शेंडे महाराज, ग्रामविकास अधिकारी बनकर, दीपक पिसे, शाळा व्यवस्थापन समितीचे दादासाहेब पिसे, शिवाजी मेहत्रे, हरिदास वाघ, प्रियंका पिसे, लक्ष्मी गायकवाड, पोलीस पाटील सुमंत गायकवाड, जि प शाळा पिसेवाडी चे मुख्याध्यापक राजेंद्र घाडगे, ज्ञानेश्वर साळुंखे, शिवाली देशमुख, जालिंदर बनकर, संध्या माळी, बिंटू खाडे, प्रशांत पाटील, अवंती सिंदफळकर, वंदना चव्हाण, खोखो पंचअजीत बनकर तसेच माळशिरस तालुक्यातून विविध जिल्हा परिषद शाळेतून क्रीडा शिक्षक, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

### सुरत-चेन्नई ग्रिनफील्ड महामार्गासाठी जमीन मोजणीची नोटीस मिळाली नसल्याने

# परंड्यातील शेतकऱ्यांचा जमिनीच्या मोजणीला विरोध

**परांडा** : सुरत-चेन्नई महामार्गासाठी संपादीत जमीनीचा मोबदला जाहिर करण्यात येत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून उस्मानाबाद जिल्हयातील साकत पाठोपाठ रोहकल येथील शेतकऱ्यांनी दि २९ डिसेंबर रोजीच्या जमिणीच्या मोजणीला नोटीस मिळाली नसल्याने विरोध केला आहे.

सुरत-चेन्नई महामार्गासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कार्यालयाच्या वतीने जमीन संपदनाची प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे. मात्र जमीनीची मोजणी पुर्व शेतकऱ्यांना नोटीसा मिळाल्या नाही तसेच मोबदला जाहिर करण्यात आला नसल्याने शेतकऱ्यातून जमीन मोजणीला विरोध होत आहे. २९ डिसेंबर रोजी परंडा तालूक्यातील रोहकल शिवारातून जानाऱ्या महामार्गाच्या जमीन मोजणी साठी आधिकारी पोलिस बंदोबस्त घेऊन आले होते. यावेळी शेतकऱ्यांनी नोटीस मिळाली नसल्याने मोजणीला विरोध केला. यावेळी मोजणी ठिकाणी एका निवृत्त कर्मचारी यांची मोजणीसाठी नेमनुक नसताना शेतकऱ्यांना आरेरावी करीत



असल्याचा आरोप शेतकऱ्यानी केला आहे. प्रशासन शेतकऱ्यांचा विचार करीत नसल्याने परंडा तालूक्यातील शेतकऱ्यामध्ये संताप व्यक्त होत आहे. जमीन आमच्या हक्काची नाही कोणाच्या बापाची अशा घोषणा देत बाजारभावा पेक्षा पाच पट रक्कम देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. सहाय्यक पोनि निरिक्षक हिंगे यांच्या नेतृत्वाखाली मोजणी ठिकाणी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी शेतकरी संघर्ष समीतीचे बाळासाहेब जाधव, काकासाहेब देशमुख, शिवाजी देशमुख, दादा काळे, बाबा शेख, मल्हारी पिंगळे, रामेश्वर कोलते, भिमराव देशमाने, आनसर जाधव, महादेव जाधव, गिरीधर कोलते, मधूकर जाधव, सुभाष जाधव, पुरुषोत्तम देशमाने, बिभिषण गव्हाणे, गणपती वाघ, बाळहारी जाधव, विष्णू जाधव, अंकुश कोळी, गुरुदास जाधव, नितिन सरवदे, समीर गव्हाणे, रामभाऊ जाधव, चंद्रकांत जाधव, दत्तात्रय देशमाने, किसण फरतडे, आदम शेख यांच्या सह शेतकरी मोठया संखेने उपस्थित होते.

# आईला मुखाग्नी देऊन मोदी दीड तासात कर्तव्यावर

## आईच्या पार्थिवाला खांदा देत पुत्र धर्म निभावला

सुराज्य/अहमदाबाद

**पंतप्रधान नरेंद्र मोदी हे त्यांच्या अथक परिश्रम करण्याच्या वृत्तीमुळे सातत्याने चर्चेत असतात. नरेंद्र मोदी हे देशासाठी सर्वस्व झोकून देऊन दिवसरात्र काम करतात, असे त्यांच्या समर्थकांकडून अभिमानाने सांगितले जाते. मोदींच्या याच गुणाचा प्रत्यय शुक्रवारी देशवासियांना आला.**

--------------------



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्री हिराबेन मोदी यांचे शुक्रवारी पहाटे तीन वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. नरेंद्र मोदी यांनी साधारण सहाच्या सुमारास ट्विट करुन आईच्या निधनाबद्दल सर्वांना माहिती दिली. यानंतर नरेंद्र मोदी आपल्या आईचे अंत्यदर्शन घेण्यासाठी अहमदाबाद येथील आपल्या भावाच्या घरी पोहोचले. येथून सकाळी आठच्या सुमारास हिराबेन मोदी यांची अंत्ययात्रा निघाली. यानंतर तास-दीड तासात पंतप्रधान मोदी यांनी आपल्या आईच्या पार्थिवाला अग्नी दिला.

आईच्या निधनामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी दिवसभरातील सर्व कार्यक्रम रद्द करतील, असा अनेकांचा अंदाज होता. परंतु, नेमक्या याचवेळी नरेंद्र मोदी यांनी आपण इतरांपेक्षा वेगळे का आहोत, हे दाखवून दिले.

पंतप्रधान मोदी हे आईच्या निधनाचे दुःख बाजूला सारून अवघ्या काही तासांमध्ये पुन्हा देशसेवेसाठी रुजू झाले.

## पंतप्रधान मोदींनी घेतले आईचे शेवटचे दर्शन

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे शुक्रवारी पश्चिम बंगालमध्ये 'वंदे भारत एक्स्प्रेस'सह काही विकास प्रकल्पांचे उद्घाटन करणार होते. परंतु, आईच्या निधनामुळे मोदी या कार्यक्रमाला जाणार नाहीत, अशी अटकळ बहुतेकांनी बांधली होती. परंतु, आईच्या चितेला अग्नी दिल्यानंतर पंतप्रधान मोदी अवघ्या दीड तासात या कार्यक्रमासाठी सज्ज झाले. त्यांना पश्चिम बंगालला प्रत्यक्षात जाता आले नाही, पण मोदींनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या कार्यक्रमाला उपस्थिती लावली.



संपूर्ण वेळ मोदी या कार्यक्रमात हजर होते. यानंतर मोदींनी हिरवा झेंडा दाखवून पश्चिम बंगालमधील 'वंदे भारत एक्स्प्रेस'चे लोकार्पण केले. यानंतर पंतप्रधान मोदी नियोजित वेळापत्रकानुसार पुढच्या कार्यक्रमांना उपस्थिती लावतील. आईच्या निधनाला काही तास उलटत नाही तोच पंतप्रधान मोदी पुन्हा कामाला लागल्याचे पाहून अनेकजण स्तिमीत झाले.

'पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सांत्वन केले. आदरणीय पंतप्रधान, आजचा दिवस तुमच्यासाठी अत्यंत दु:खाचा आणि अपरिमित हानीचा आहे.

आज तुम्ही विकासकामांच्या उद्घाटनासाठी पश्चिम बंगालमध्ये येणार होतात. पण आईच्या निधनामुळे तुम्हांला या कार्यक्रमाला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थिती लावावी लागत आहे. मी ईश्वराकडे प्रार्थना करते की, तुम्हांला या दु:खातून सावरण्यासाठी बळ मिळो, असे ममता बॅनर्जी यांनी म्हटले.'

## सोने-चांदीचे दागिने कधीच घातले नाही




आईचे आयुष्य गरीबीत गेले. ती लहान असतानाच आमच्या आजीचे निधन झाले. यामुळे घराची जबाबदारी आल्याने तिला बालपण तसे मिळाले नाही. लहान असताना तिला मोठी जबाबदारी पार पाडावी लागली. त्यांच्या कुटुंबात ती सर्वात मोठी होती. लग्नानंतरही ती घरातील मोठी सून झाली. तिच्याकडे कुठलेही दागिने किंवा मौल्यवान वस्तू नाहीत, असे मोदींनी म्हटले. मी कधीच आईला सोन्याचे दागिने किंवा मौल्यवान वस्तू घालताना पाहिलेले नाही. तिने कधी सोने-चांदीचे दागिने घातले नाहीत. अतिशय साधे आयुष्य ती जगली. आदर आणि विनम्रता हा सर्वोत्तम गुण होता. आमचे घर छोटं होतं. पण आईचे हृदय विशाल होते, असे पंतप्रधान मोदींनी ब्लॉगमध्ये म्हटले होते.

## आईने मला शेवटपर्यंत एकेरीत हाक मारली नाही



आम्ही लहान होतो, तेंव्हा शाळा बुडवून आपल्याला मदत करावी, असे तिने कधीच म्हटले नाही. आमची घरची आर्थिक परिस्थिती बिकट होती. आपल्या आईने खूप कष्ट केली. इतरांच्या घरी जाऊनही कामे केली. जेव्हा वेळ मिळायचा तेव्हा ती सूत कताईचं काम करायची. माझी आई माझ्याशी गुजरातीतच बोलत होती. जेवढे दिवस मी घरी होतो तेव्हा ती मला गुजरातीतून हाक मारताना तू म्हणायची. पण मी मार्ग बदलला आणि घर सोडले, त्यानंतर तिने मला कधीही एकेरी हाक मारली नाही. ती आजही मला तमे असे म्हणते, असे पंतप्रधान मोदींनी ब्लॉगमध्ये लिहिले होते.

## ऋषभ रस्त्यावर तडफडत असताना काही जण पैसे गोळा करत व्हिडिओ काढत होते

**सुराज्य/नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाचा धडाकेबाज खेळाडू ऋषभ पंत यांच्या मर्सिडीज कारला शुक्रवारी पहाटे भीषण अपघात झाला. हा अपघात इतका भयंकर होता की डिवायडरला आदळल्यावर कारने लगेचच पेट घेतला. यावेळी आत अडकलेल्या ऋषभने गाडीची काच फोडून कसा बसा आपला जीव वाचवला. पण त्यानंतर मदतीसाठी तो लोकांकडे गयावया करत असताना अनेक जण मदतीऐवजी त्याचा व्हिडिओ काढत होते.



अपघात झाला तेव्हा ऋषभच्या कारमध्ये तीन ते चार लाख रुपये होते. अपघात होताच हे पैसे रस्त्यावर विखुरले. हे पाहताच अनेकांनी ऋषभला मदत करण्याऐवजी पैसे गोळा करत त्याचा व्हिडिओ काढत होते. तर ऋषभ वेदनेने तडफडत होता. त्याचवेळी तिथे दोघे जण आले. त्यांनी तातडीने १०८ क्रमांकावर फोन करून अपघाताची माहिती दिली आणि ॲम्ब्युलन्स पाठवण्याची विनंती केली. त्यानंतर ऋषभला डेहराडून येथील मॅक्स रुग्णालयात दाखल करण्यात आले. ऋषभला रुग्णालयात दाखल करण्यासाठी या दोन तरुणांनी धावपळ केली. ते त्याच्याबरोबरच रुग्णालयातही थांबले होते.

यातील एकजण घटनास्थळापासून काही अंतरावर असलेल्या साखर कारख्यानात नोकरी करतो. सकाळी तो नेहमीप्रमाणे कामावर जात असताना ऋषभच्या गाडीला अपघात झाला. त्याने लगेचच ऋषभ पंतला ओळखले. ज्यावेळी त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले त्यावेळी ऋषभची प्रकृती गंभीर होती. पण दोन युवकांनी प्रसंगावधान ओळखत त्याला वेळेत रुग्णालयात दाखल केल्याने ऋषभवर तातडीने उपचार करणे शक्य झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

---

## यहाँ के भाई हम हैं ।

### ठाकरे गटाच्या कार्यालयावर गोळीबार

सुराज्य/पुणे



पुण्यातील वानवडीमधील ठाकरे गटाच्या कार्यालयावर गोळीबार झालेला आहे. वानवडी पोलिस स्टेशनच्या हद्दीत शिवसेना अल्पसंख्याक सेलच्या जिल्हाध्यक्षाच्या कार्यालयावर टोळक्याकडून फायरिंग झालेलं आहे. राज्यात सत्तांतर झाल्यानंतर शिंदे-ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमधला संघर्ष काही थांबण्याचं नाव घेत नाहीये. इकडे मुंबईत महापालिकेमधील कार्यालयासाठी शिंदे-ठाकरे गटाचे कार्यकर्ते भिडलेले असताना पुण्यातून गोळीबाराचं प्रकरण समोर येतंय.

पूर्व वैमनस्यातून दहशत निर्माण करण्यासाठी स्वत:ला भाई म्हणविणाऱ्याने हातात पिस्तुल घेऊन हवेत गोळीबार करण्याचा प्रकार वानवडीत समोर आला आहे.

मुख्य रस्त्यावर येऊन अतिक नामक युवकाने हातात पिस्तुल घेऊन 'यहाँ के भाई हम है, हमारे नाद को लगे तो जान से हात धो बैठोगे', असं म्हणत पिस्तुलातून फायरिंग करुन दहशत निर्माण केली. संबंधित युवकाविरोधात पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करतायेत.

## हक्कावर गदा...

## ऊसतोड मजुरांची दोन हजारांहून अधिक मुले शिक्षणापासून वंचित

**सुराज्य/कोल्हापूर : कोल्हापूर,बीड, नगर जिल्ह्यातील दोन हजाराहून अधिक मुलं शिक्षणापासून वंचित असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. कोल्हापुरातील अवनी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून ही माहिती समोर आली आहे. यात प्रामुख्याने ऊसतोड मजूर, वीटभट्टीवर काम करणाऱ्यांच्या मुलांचा समावेश आहे.**



दरवर्षी ऊस तोडणीसाठी बीड, उस्मानाबाद, नगर जिल्ह्यातील हजारो ऊसतोड मजूर पश्चिम महाराष्ट्रात दाखल होत असतात. यांच्यासोबत अगदी जन्मलेल्या बाळापासून ते १८ वर्षांपर्यंतची त्यांची मुलेही असतात. कोल्हापूर जिल्ह्यात शिक्षणापासून दूर असलेल्या ऊसतोड मजूर आणि वीटभट्टी कामगारांच्या मुलांची संख्या लक्षणीय असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ऊसतोड मजूर आणि वीटभट्टी कामगारांच्या शाळाबाह्य मुलांची संख्या तब्बल २ हजार ४९५ इतकी असल्याची माहिती अवनी या सामाजिक संस्थेने केलेल्या सर्व्हेक्षणात माध्यमातून समोर आली आहे. कोल्हापुरातील ० ते १८ वयोगटातील या मजुरांची मुले ही शिक्षणापासून वंचित आहेत. शिक्षणाचा मूलभूत हक्क गमावून बसलेली ही मुलं दिसून येत आहेत.

जिल्ह्यातील ११ साखर कारखाने आणि वीटभट्ट्यांवर ० ते ३ वयोगटातील ५१७ बालकं, ४ ते ६ वयोगटातील ५११ मुलं, ७ ते १४ वयोगटातील ११६३, तर १५ ते १८ वयोगटातील ४९४ मुलं आढळली आहेत. एकूणच या स्थलांतराची आणि हंगामी शाळाबाह्य मुलांना शिक्षणाचा हक्क मिळवून शासनाकडे दाद मागणार असल्याचे अवनी संस्थेच्या अध्यक्षा अनुराधा भोसले यांनी सांगितले. याबाबत कार्यवाही न झाल्यास आंदोलनाचा इशाराही भोसले यांनी दिला आहे.

## सैराटची पुनरावृत्ती

### बहिणीशी प्रेमविवाह केलेल्या तरुणाला संपवले, मग हायवेवरच नृत्य

सुराज्य/औरंगाबाद

**सैराटच्या पुनरावृत्तीने पुन्हा मराठवाडा हदरला आहे. काही वर्षांपूर्वी बीड जिल्ह्यात तरुणाचा प्रेमविवाह केला म्हणून रस्त्यावर खून करण्यात आला होता. औरंगाबादमध्ये अशीच घटना गुरुवारी समोर आली आहे.**

तीन वर्षांपूर्वी बहिणीला पळवून नेत प्रेमविवाह केलेल्या तरुणाला महामार्गावर गाठत धारदार कुऱ्हाडीने हल्ला चढवत हत्या करण्यात आली आहे. संबंधित व्यक्ती मृत झाल्याची खात्री झाल्यानंतर महामार्गावर नृत्य करत मारेकऱ्यानं दुचाकीवरुन पोबारा केला. ही धक्कादायक घटना औरंगाबाद -पुणे महामार्गावरील दहेगावबंगला येथील इसारवाडीफाटा जवळ घडली. मन हेलावून टाकणाऱ्या या घटनेमुळे मराठवाडा हादरला आहे. बापू खिल्लारे वय- २९ वर्षे (रा. औरंगाबाद) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे.



या धक्कादायक घटनेप्रकरणी प्रत्यक्षदर्शी आणी सूत्रानुसार मिळालेली प्राथमिक माहिती अशी की, 'बापू यांनी तीन वर्षापूर्वी सासरच्या नातलगांचा विरोध झुगारून पळून जाऊन प्रेमविवाह केला होता. ते गुरुवारी औरंगाबाद - पुणे महामार्गावरून दुचाकीने जात असताना त्यांच्या मेव्हण्याने महामार्गावरील दहेगाव बंगला जवळील इसारवाडी फाटा येथे अडविले. कुठलीही विचारपूस न करता धारदार कुऱ्हाडीने बापू यांच्यावर हल्ला चढविला.

एका नंतर एक सपासप असे अनेक वार झाल्याने बापू खिल्लारे रक्ताच्या थारोळ्यात महामार्गावर कोसळले. बापू रस्त्यावर तडफडत होते. मात्र, त्याच वेळी मारेकरी हातात रक्ताने माखलेली कुऱ्हाड खांद्यावर ठेवून तो प्रसंग पाहत उभा होता.

रक्तबंबाळ अवस्थेत रस्त्यावर व्यक्ती तडफडतोय आणि समोर मारेकरी कुऱ्हाड घेऊन उभा हे भयावह दृश्य पाहून महामार्गाने जाणारे वाहनधारक देखील भयभीत झाले होते.

## शेतमालाचे करणार मार्केटिंग : कृषी आयुक्त

सुराज्य/पुणे

**शेतमालाला योग्य भाव मिळाला तर, शेतकऱ्यांच्या कष्टांचे चीज होते. मात्र, अनेकदा शेतकऱ्यांना पिकांचे योग्य 'मार्केटिंग' जमतेच असे नाही. या पार्श्वभूमीवर राज्याच्या कृषी विभागाने शेतमालाचे मार्केटिंग करण्यासाठी खात्यातीलच काही कर्मचाऱ्यांची मदत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत कृषी विभाग लवकरच स्वतंत्र धोरण जाहीर करणार आहे.**



शेतकरी शेतमाल पिकवितो आणि बाजार समितीत विक्रीसाठी आणतो. काही वस्तू आता नियमनमुक्त झाल्या आहेत. त्यामुळे बाजार समितीत आडत्यांमार्फत विकण्याची गरज नाही. त्या वस्तू अथवा शेतमाल थेट बाजाराबाहेर विकता येणार आहे. त्यासाठी 'मार्केटिंग'ची गरज आहे. कृषी आयुक्त सुनील चव्हाण यांनीही शेतकऱ्यांना शेतमालाला चांगला दर मिळावा यासाठी 'मार्केटिंग'चे धोरण राबविण्याची गरज व्यक्त केली आहे.

## कोयते नाचवत सिंहगड परिसरात दोघांचा राडा

**सुराज्य/पुणे :** पुण्यातील आंबेगाव येथील सिंहगड विधी महाविद्यालय परिसरात कोयता घेऊन दोघांनी दहशत निर्माण केल्याची घटना बुधवारी रात्री घडली. आरोपींनी वाहनांबरोबरच दिसेल त्या व्यक्तींवर आणि दुकानांवर कोयत्याने वार करण्याचा प्रयत्न केला. अचानक घडलेल्या या घटनेने घाबरलेले नागरिक पळत सुटले होते. गस्तीवर असलेल्या सिंहगड पोलिसांच्या दोन कर्मचाऱ्यांनी पाठलाग करून यातील एका अल्पवयीनाला पकडले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

## कोरोनाकाळात फोफावले बोगस डॉक्टरांचे पीक

### दोन वर्षांत १२ डॉक्टरांवर कारवाई

सुराज्य/पुणे

कोरोना सारख्या साथरोगाच्या काळात रुग्णांच्या असहायतेचा फायदा घेऊन शहरात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झाल्याची माहिती पुढे आली आहे. पुणे शहर आणि परिसरात २०२० ते २०२२ या दोन वर्षांत १२ बोगस डॉक्टर आढळून आले आहेत. त्यामुळे उपचार घेताना डॉक्टरची माहिती जाणून घेणे आवश्क आहे; अन्यथा फसवणूक होण्याची शक्यता आहे.

शहर आणि परिसरात गेल्या नऊ वर्षांत ४७ बोगस डॉक्टर आढळून आले. शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये या डॉक्टरांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून, काहींच्या कोर्टात केसही सुरू आहेत. आढळून आलेल्या बोगस डॉक्टरांमध्ये सर्व प्रकारच्या पॅथीच्या डॉक्टरांचा समावेश आहे. शहरातील बसस्थानक, चौकांमध्ये, सर्वाजनिक स्वच्छतागृह या ठिकाणी विविध आजारांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या जाहिराती दिसून येतात. हल्ली सोशल मीडियाच्या माध्यमातूनही जाहिराती केल्या जातात. अशा जाहिरातींच्या माध्यमातून फसवणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी जाहिरातींना भुलून उपचार घेऊ नयेत, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# राज्यातील आठ हजार फेरफार प्रलंबित

## महसूल विभागाचे जिल्हाधिकाऱ्यांना कार्यवाहीचे निर्देश

सुराज्य/पुणे

**राज्यातील एप्रिल २०२१पूर्वी नोंदविलेले अंदाजे आठ हजार 'ऑनलाइन' फेरफार अद्याप निर्णयाविना प्रलंबित आहेत. एका वर्षात तपासणीची गरज असतानाही ते तपासण्यात आलेले नाहीत. त्यामुळे ते तपासून कार्यवाही करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना महसूल विभागाने दिले आहेत. त्यामुळे प्रलंबित 'ऑनलाइन' फेरफार निकाली निघण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**

राज्यात 'ई-चावडी' प्रकल्पांतर्गत विविध सातबारे, ई-फेरफार, प्रॉपर्टीकार्ड यांसारखे महत्त्वाचे दस्तावेज सहज उपलब्ध होत आहेत. त्यामुळे नागरिकांना थेट 'महाभूमी'च्या वेबसाइटवर जाऊन ठराविक शुल्क भरून ते डाउनलोड करणे शक्य झाले आहेत. त्यामुळे तलाठ्यांपासून ते तहसीलदार कार्यालयापर्यंत हेलपाटे मारण्याचा त्रास वाचला आहे. परिणामी, नागरिकांचा वेळ, पैसा वाचण्यास मदत झाली आहे.



राज्यात २०१८ पासून 'ऑनलाइन फेरफार' उतारा मिळू लागला आहे. त्यापूर्वीचे फेरफार प्रलंबित आहेत. त्यावर अद्याप निर्णय घेतला गेला नसल्याचे महसूल विभागाच्या निदर्शनास आले आहेत. त्या फेरफारची यादी महसूल विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना पाठविली आहे. जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १५० (४) नुसार एका वर्षाच्या आत फेरफारची तपासणी करून ते निकाली काढणे आवश्यक आहे. मात्र, एका वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतरही फेरफार तपासणी करण्यात आली नाही. त्यासाठी ते फेरफार तपासणीचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

'ई-चावडी' प्रकल्पांतर्गत फेरफार आता ऑनलाइन उपलब्ध झाले आहेत. राज्यात सध्या पाच हजार ७९२ फेरफार ऑफलाइन, तर २०९७ हे ऑनलाइन फेरफार तपासणी न झाल्याने त्याबाबत निर्णय झाले नाहीत. त्यामुळे ते प्रलंबित आहेत. प्रलंबित फेरफार निकाली काढण्याच्या हेतूनेच जिल्हाधिकाऱ्यांना ही यादी पाठविण्यात आली आहे. प्रत्येक फेरफार अंतिम का करण्यात आला नाही याची तपासणी केल्यानंतरच त्यातील त्रुटी स्पष्ट होणार आहेत, असेही सांगण्यात आले.

## मनसेच्या इशाऱ्यानंतर पाक चित्रपटाचे प्रदर्शन रद्द

**सुराज्य/मुंबई :** अभिनेता फवाद खान आणि माहिरा खान यांचा बहुचर्चित 'द लीजेंड ऑफ मौला जट्ट' हा बॉक्स ऑफिसवर हिट ठरला आहे. या चित्रपटाने जगभरातील बॉक्स ऑफिसवर चांगला गल्ला जमावला होता. त्यानतंर आता हा चित्रपट ३० डिसेंबरला भारतातील चित्रपटगृहात प्रदर्शित केला जाणार होता. मात्र, आता या चित्रपटाचे प्रदर्शन रद्द करण्यात आले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या आक्रमक पावित्र्यानंतर आता या चित्रपटाचे प्रदर्शन रद्द करण्यात आले आहे.

# प्रस्तावित पंढरपूर कॉरिडॉरमधून होळकर वाडा वगळा

## पुरातत्व विभागाच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

सुराज्य/सोलापूर

प्रस्तावित पंढरपूकर कॅरिडॉर अंतर्गत चंद्रभागेच्या काठावरील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वाडा बाधित होणार असून वास्तुचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्व लक्षात घेवून त्याचे नुकसान करू नये अशी सूचना पुरातत्व व वस्तुसंग्रहालय विभागाचे संचालकांनी जिल्हाधिकाऱ्यांना केली आहे.

याबाबत होळकर वाड्याचे व्यवस्थापक आदित्य फत्तेपूरकर यांनी माहिती दिली असून कॅरिडॉर विरोधामधील हे एक मोठे यश असल्याची प्रतिक्रीया दिली आहे. प्रस्तावित पंढरपूर विकास आराखड्या अंतर्गत महाव्दार पोलीस चौकी ते महाव्दार घाट पर्यंत रूंदीकरण सुचविण्यात आले आहे. या रूंदीकरणामध्ये तसेच प्रस्तावित कॅरिडॉरमध्ये अडीचशे वर्षापूर्वीच्या होळकर वाड्यातील राम मंदिर, हनुमान मंदिर देखील बाधित होणार आहेत. यास अनेकांनी कडाडून विरोध केला आहे. होळकर वाड्याचे व्यवस्थापक फत्तेपूरकर यांनी देखील आक्षेप घेतला आहे. तसेच केंद्र शासनाच्या पुरातत्व विभागास सदर वास्तू विषयक सविस्तर माहिती देत तो बाधित होवू नये यासाठी निवेदन दिले




होते. याची पुरातत्व विभागाने दखल घेतली असून राज्याच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय विभागाचे संचालक डॉ.तेजस गर्गे यांनी सोलापूर जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना पत्र दिले आहे. यामध्ये पंढरपूर शहर विकास आराखड्यामधील विषय क्रमांक १३ मध्ये होळकर वाड्यातील श्रीराम मंदिर व हनुमान मंदिर याचे नुकसान होणार नाही अशी सूचना केली आहे.

सदर पत्रामध्ये होळकर वाड्याचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्व असल्याचे नमूद केले आहे. दरम्यान, होळकर संस्थान इंदोर व येथील विविध पुरातन वास्तू प्रेमींनी होळकर वाड्या विषयी वारंवार प्रयत्न सुरू ठेवले होते.

आदित्य फत्तेपूरकर यांनी विविध मंत्री, आमदार, राजकीय पदाधिकारी तसेच अभ्यासकांशी याबाबत संपर्क साधून हा लढा उभारला होता. कॅरिडॉर विरोधी आघाडीसाठी हे एक महत्वाचे यश मानले जात आहे.

### ■ बाजीराव विहिरीचे संरक्षण

पुणे रस्त्यावरील ऐतिहासिक बाजीराव विहिर देखील पालखी मार्गाच्या कामांमध्ये बुजविण्यात येणार होती. मात्र याबाबत देखील अशाच पध्दतीने पुरातन विभागाकडे तक्रार करण्यात आली होती. या विहिरचे प्राचीन महत्व लक्षात घेवून पुरातत्व विभागाने विहीरीचे नुकसान करू नये अशी सूचना संबंधित विभागास केली होती. यामुळे रस्ता रूंदीकरणात ही विहिर कायम राहिली आहे. याच पध्दतीने होळकर वाडा बचावाला देखील यश आले आहे.

## गर्दीच्या ठिकाणी महिलांचे दागिने चोरणाऱ्या महिलेस अटक

**सोलापूर** : शहरातील सराफ बाजार, मधला मारुती आदी परीसरात सण उत्सवाच्या वेळी खरेदीसाठी आलेल्या ग्राहक महिलाच्या पर्समधून गर्दीचा फायदा घेऊन मौल्यवान दागिने, रोख रक्कम पळवणाऱ्या महिलेला गुन्हे शाखेने ताब्यात घेतले. तिच्याकडून तीन गुन्ह्यामध्ये ६४ हजार रुपये किमतीचे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने मिळुन आले आहेत.

सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन निरगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली कुसुमराज मल्टीपर्पज हॉल विजापूर रोड या ठिकाणी असणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावर सापळा रचून महिला पोलीस अंमलदारामार्फत सुचित्रा ज्ञानेश्वर जाधव (वय-३५, रा.साईबाबा मंदिरच्या पाठीमागे, होटगी, दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) हिला ताब्यात ताब्यात घेतले.

तिने मधला मारुती परिसरात चोरी केल्याचे कबुली दिली. जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात यापूर्वी तिच्याविरुद्ध तीन गुन्हे केल्याची नोंद झाली आहे. तिच्याकडे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने मिळुन आले आहेत. ही कामगिरी पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त दिपाली काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन निरगुडे, पोहे.दिलीप भालशंकर, संजय साळुंखे, तांबोळी, सोनवणे, प्रकाश गायकवाड, प्रविण शेळकंदे, वसीम शेख यांनी केलेली आहे.

## पोलिसात तक्रार दिल्याने महिलेस मारहाण

**सोलापूर** : पोलिसात तक्रार दिल्याने चिडून जाऊन महिलेस लाकडी दांडक्याने मारून जखमी केले आणि तिच्या मुलीचा मोबाईल फोडून नुकसान केल्याबद्दल एका विरोधात विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अलका चंद्रकांत कासे (वय-४०,रा. हराळे नगर, विमानतळ जवळ, सोलापूर) यांची मुलगी सोनाली ही रामकृष्ण हॉस्पिटल येथे कामाला आहे. त्या ठिकाणी संशयित आरोपी लक्ष्मण शंकर कणीकर हा गेला आणि तू येथे काम कसे करते ते मी बघून घेतो असे म्हणत शिवीगाळ करून धमकी दिली.त्यामुळे अलका कासे यांनी आरोपीच्या विरोधात विजापूर नाका पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.याचा राग मनात धरून आरोपीने अलका यांना शिवीगाळ करून लाकडी दांडक्याने मारहाण केली तसेच सोनालीचा मोबाईल फोडून नुकसान केले.विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तपास पो.हे.कॉ. मनुरे हे करत आहेत.




## बाजारात गेल्यानंतर चोरट्याने केली घरफोडी

**सोलापूर** : घरगुती किराणा साहित्य आणण्याकरिता बाजारात गेल्यानंतर चोरट्याने घराच्या दरवाजाचा कडी-कोंयडा काढून बेडरूम मधील लोखंडी कपाटात असलेले सोन्या-चांदीचे एक लाख रुपये किमतीचे दागिने, रोख रक्कम चोरून नेल्याची घटना मल्लिकार्जुन नगरात घडली. अमीर इकबाल कुर्ले (वय-३५,रा.आरमान रेसिडेन्सी, मल्लिकार्जुन नगर, सोलापूर) हे घरगुती किराणा साहित्य आणण्याकरिता घराला कुलूप लावून बाहेर गेले असताना,अज्ञात चोरट्याने ही चोरी करत घरातील कपाटातील रोख ५० हजार आणि दागिने मिळथून १ लाख ५४ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून गेला. अमीर कुल यांनी तात्काळ एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तपास स.पो.नि. निरीक्षक चौधरी हे करीत आहेत.

## विहितेचा छळ; पतीसह चौघांवर गुन्हे

**सोलापूर** : लग्नात मानपान व्यवस्थित केला नाही हुंडा जास्त दिला नाही. लॉकडाऊन मध्ये लग्न झाल्यामुळे मानपान व्यवस्थित झाला नाही यासह विवि कारणावरून विवाहितेला शिवीगाळ मारहाण केल्याप्रकरणी पतीसह चौघांवर सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. प्रियंका रायकर (वय-२२, रा.रेल्वे लाईन्स, कोनापूरे चाळ) हिचे संदीपबरोबर २० जून २०२० साली लग्न झाले होते. लग्नानंतरनवरा संदीप रायकर, सासु सुशीला रायकर, पतीचे काका दिलीप पऱ्हाडे, पतीची मावशी जम्मा जुरुंगे (रा.सर्वजण उरळीकांचन, जिल्हा पुणे) यांनी प्रियंकाला त्रास देण्यास सुरूवात केली. तपास पो.हे.कॉ. कंचे करत आहेत.

## विद्युत कर्मचाऱ्यास मारहाण; दोघे निर्दोष

**सोलापूर** : विजेचे थकीत बिल भरले नाही म्हणून कारवाई करण्यासाठी आलेल्या विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यास मारहाण करून शासकीय कामात अडथळा केल्याच्या आरोपातून दीपक कोळेकर(मयत) आणि सोमनाथ नागनाथ सुभेदार (रा.वडाळा ता.उत्तर सोलापूर) यांना गुन्हा शाबित न झाल्यामुळे निर्दोष मुक्त करण्याचा आदेश अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही.एच.पाटवदकर यांनी नुकताच दिला. ३० जानेवारी २०१९ रोजी विद्युत वितरण कंपनीचे अंगद भिमराव डोके (वरिष्ठ तंत्रज्ञ) यास दोघांनी वडाळा येथील उपकेंद्रात जाऊन शिवीगाळ आणि धमकी दिली होती. त्यानंतर सायंकाळी त्यांना एसटी स्टँड परिसरात धक्का बुक्की करून ठार मारण्याची धमकी दिली. असे सरकार पक्षाचे म्हणणे होते. या खटल्यात आरोपीतर्फे ॲड. भारत कट्टे आणि ॲड. संजय माने यांनी काम पाहिले.

रोहयोची अशी ही साथ

## जिल्ह्यातील ४० हजार मजुरांना मिळाला घामाचा दाम

सुराज्य/सोलापूर

**महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत जिल्ह्यात सध्या मोठ्या प्रमाणात कामे चालू आहेत. आता पर्यंत चाळीस हजार मजुरांच्या हाताला काम मिळाले आहे. या कामाचा घामाचा दाम म्हणून तब्बल १४ कोटी ६० लाखांची मुजरीचे वाटप झाले आहे.**

ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक आणि महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचे अतूट नाते निर्माण झालेले आहे. रोजगार हमी योजनेची साथ सर्वसामान्यांसाठी सार्थ ठरत आहे. संसाराचा गाडा हाकण्यासाठी रोजगार हमी योजनेची मोठी साथ मिळत आहे. या कामातून मिळणाऱ्या रोजगारातून मजुरांच्या परिवाराची भुक शमली जात आहे. कोरोनामुळे आलेले आर्थिक संकट रोहोओ मुळे दूर होण्यास मदत झाली आहे. ग्रामपंचायती अंतर्गत ३३१ कामे सुरू आहेत. १६३१ जणांच्या हाताला काम मिळाले आहे तर शासकीय यंत्रणांमार्फत ३४७ कामे आहेत या कामातून १४३८ कामगारांना मजुरी मिळाली आहे अशा एकूण ६७८ कामांवर ३०६९ मजूराच्या घामाचा दाम म्हणून १४ कोटींचे वाटप नऊ महिन्यामध्ये रोजगार हमी योजनेच्यामाध्यमातून करण्यात आले आहे.सार्वजनिक पाणीपुरवठा विहीर, वैयक्तिक



सिंचन विहीर, घरकुल शोषखड्डे, फळबाग लागवड, रोपवाटिका लागवड, रेशीम उद्योग, तुती लागवड, बांधावर वृक्ष लागवड या कामाचा समावेश आहे.

अक्कलकोट तालुक्यातील ९४ कामांवर ३९७, बार्शी तालुक्यातील ८१ कामावर ४९७, करमाळा तालुक्यातील ६१ कामावर ३०१, माढा तालुक्यातील ७६ कामांवर १४३, माळशिरस तालुक्यातील १०८ कामांवर ४९६, मंगळवेढा तालुक्यातील ५ कामांवर ३५, मोहोळ तालुक्यातील १०८ कामांवर ४५१, पंढरपूर तालुक्यातील २४ कामांवर १३९, सांगोला तालुक्यातील ५६ कामांवर २६७, उत्तर सोलापूर तालुक्यातील १८ कामांवर १६० आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील ५७ कामांवर ८३ मजुरांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

## रुक्मिणीबाई उदगिरी यांचे निधन

**सोलापूर** : येथील समर्थ डव्हटाईझर्सचे संतोष रामचंद्र उदगिरी यांच्या मातोश्री रुक्मणीबाई रामचंद्र उदगिरी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्याचे वय



८३ वर्ष होते. त्यांची अंतयात्रा रुपाभवानी स्मशानभूमी येथे सायंकाळी ७ वाजता राहत्या घरातील कुंभारवेस येथून निघणार आहे. त्यांच्या पश्चात ४ मुली, ३ मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## रविवारी जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हा योग परिषद, राणी कित्तुर चन्नम्मा प्रतिष्ठान व रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, १ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता खुली जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा आयोजित केली आहे. यासाठी विविध ५० शाळांतून १० हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले. त्यातून निवडलेले व खुल्या गटातील स्पर्धक असे एकूण एक हजार ४०० स्पर्धक विविध १६ वयोगटात भाग घेणार आहेत.

## सिध्देश्वर कृषी प्रदर्शनाच्या डॉग शो ला प्रतिसाद

### गोल्डन रिट्रिव्हर, गब्बर, पॉमेरियनने जिंकली मने

सुराज्य/सोलापूर

श्री सिद्धेश्वर देवस्थान आयोजित श्री सिद्धेश्वर कृषी प्रदर्शनाचा दुसरा दिवस भव्य अशा डॉग शोने चांगलाच रंगला. या प्रदर्शनात देशी, विदेशी प्रकारच्या तब्बल कुत्र्यांनी शोमध्ये रंगत आणली. तब्बल २७ कुत्र्यांचा सहभाग या शोमध्ये होता.

डॉग शो पाहण्यासाठी देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, पुष्कराज काडादी, हे आपल्या कुटुंबियांसह यावेळी उपस्थित होते. यावेळी जि.प.चे माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील, निवृत्त कृषी



अधिकारी विजयकुमार बरबडे, कृषी प्रदर्शन समिती प्रमुख गुरुराज माळगे यांची उपस्थिती होती. डॉ सत्यजित पाटील व स्वप्नाली चालुक्य यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. डॉग शोमध्ये देशी विदेशी गोल्डन रिट्रीव्हर, डाबरमॅन, पॉमेरियन, सायबेरीयन हस्की, रॉट वेलर, लॉब्रीडोर, टॉयपॉम, बिगल्स, रेट्रीवर, जर्मन शेफर्ड, डॅशहाउंड, पिटबुल, कारवन हाउन, हस्की अशी तब्बल २७ प्रकारच्या कुत्र्यांनी सहभाग नोंदवला. सुमारे दहा हजार रुपयांपासून ते एक लाख रुपयां पर्यंतच्या किमतीचे कुत्रे यावेळी प्राणी प्रेमींना पहायला मिळाले. या स्पर्धेत रितेश कट्टे, बालाजी मदने, सिद्धार्थ काशीद, रितेश कट्टे, स्वप्नील सुलाते, राहुल जाधव, तनिष्का रत्नपारखी, विशाल राठोड, शिवकुमार शिंदे, विशाल अक्कलवाडी, व्यंकटेश शिंदे यांनी पाळलेल्या कुत्र्यांनी बक्षीस जिंकली.

## एसटीतून उतरताना रोख रक्कम पळवली

सुराज्य/सोलापूर

सोलापूर बस स्थानकात लातूर ते सोलापूर या एसटी मधून खाली उतरत असताना धनराज नारायण उजळंबे (वय-७८,रा.सोमनाथ नगर, अकोले काठी, ता.उत्तर सोलापूर) या वृद्धाची गर्दीचा फायदा घेत अज्ञात इसमाने त्यांची रोख रक्कम चोरून नेली. फौजदार चावडी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस नाईक बाबर हे करीत आहेत.

## जि.प. आरोग्य अधिकारीपदी डॉ.पिंपळे, दूधभाते यांच्या नावाची चर्चा

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेचे आरोग्य अधिकारी डॉ. शितल कुमार जाधव यांना तडकाफडकी निलंबित केल्यामुळे त्यांच्या जागी आरोग्य विभागातील डॉ. अनिरुद्ध पिंपळे किंवा डॉ.बिराप्पा दूधभाते यांच्याकडे देण्याची शक्यता वर्तवली जात असल्याची चर्चा जिल्हा परिषदेच्या आवारात दिवसभर होत आहे.

आरोग्य अधिकारी डॉ. जाधव यांचे निलंबन झाल्यानंतर त्यांची नियुक्ती गडचिरोली येथील मुख्यालयामध्ये करण्यात आली आहे. त्यामुळे आता सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य विभागाला आरोग्य



अधिकारी म्हणून कोणाची नियुक्ती करण्यात येणार असा प्रश्न पडला असला तरी डॉ.पिंपळे आणि दूधभाते यांच्या नावाची चर्चा सध्या आहे.

जाधव यांचे निलंबन झाल्यानंतर आरोग्य विभागाच्या सांख्यिकी विभागाने शासनाकडे पदभार देण्याबाबत सूचना मागविले आहेत. पिंपळे किंवा दूधभाते यांच्याकडे पदभार देण्याची शक्यता आहे. दरम्यान राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत हे सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य विभागातील जाधव यांना निलंबित केल्यामुळे त्यांनी चांगलेच लक्ष दिल्याचे दिसत आहे. त्यामुळे कामचुकार आणि कामात हाय गय करणाऱ्या कर्मचाऱ्यांची गई केली जाणार नसल्याचे दिसत आहे.

### सीईओ आल्यानंतरच निर्णय होणार

आरोग्य अधिकारी पदासाठी दोघांची नावे चर्चेत असले तरी जि.प.चे सीईओ दिलीप स्वामी हे जोपर्यंत आपल्या कार्यालयात हजर राहत नाहीत तोपर्यंत या चर्चेवर पांघरून पडणार नाही.

### १ कोटींचा गजेंद्र



सिद्धेश्वर कृषि प्रदर्शनात सध्या दीड टन वजनाचा आणि सुमारे १ कोटींचा गजेंद्र रेडा सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. प्रदर्शनाला आलेले शेतकऱ्यांची हा रेडा पाहण्यासाठी गर्दी होत आहे.

## महापालिकेकडून नळांना मीटर लावण्याचे नियोजन; एजन्सीची चाचपणी सुरू



सुराज्य/सोलापूर

पाण्याची नासाडी व अपव्यय टाळण्यासाठी शहरात प्रत्येक नळाला मीटर लावण्याचा प्रयत्न महापालिकेकडून सुरू आहे. त्यासाठी एजन्सीची चाचपणी सुरू झाली आहे.

विविध एजन्सीसोबत चर्चा करून ही संकल्पना लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न महापालिकेकडून करण्यात येत आहे. सोलापूर शहरातील पाणीपुरवठा नियमित व सुरळीत होण्यासाठी पाणी गळती त्याचबरोबर पाण्याचा अपव्यय नासाडी टाळणे आवश्यक आहे आणि त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक नळांना मीटर लावणे अत्यावश्यक आहे.

यामुळे मुबलक पाणी उपलब्ध होऊ शकते. त्यासाठी महापालिकेने नळ मीटर लावण्याकरिता प्रयत्न सुरू आहेत. पालिकेकडून नळ मीटर बसवण्यासाठी एजन्सीची माहिती घेण्यात येत आहे. महापालिकेच्यावतीने एजन्सीने मीटर लावण्याचे काम करावे आणि त्यानंतर महापालिका पैसे अदा करेल अशाही एजन्सीची माहिती घेण्यात येत आहे. गोवा येथे तशी एजन्सी असल्याची माहिती मिळाली आहे. त्यांच्याशी महापालिका लवकरच संपर्क साधणार असल्याची माहिती आहे.

### सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी मीटर आवश्यकः आयुक्त

सध्या शहराला चार दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. त्यामुळे अनेक नागरिक दिवसभर पाणी वापरतात. त्यामुळे पाण्याची नासाडी होते. मिटर बसवल्यास पाणी कमीप्रमाणात वापरले जाईल. त्यामुळे नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा करणे शक्य होईल, असे पालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी सांगितले.

### सार्वजनिक नळ बंद करण्याची मोहीम सुरूच

सोलापूर शहरातील सार्वजनिक नळ बंद करण्याची मोहीम प्रशासनाकडून सुरूच आहे. अमृत योजनेसाठी आवश्यक असलेला शासन निधी निकष पूर्ण केल्याशिवाय महापालिकेला मिळू शकत नाही. त्या निकषांमध्ये सार्वजनिक नळ बंद करणे बंधनकारक आहे. यामुळे सार्वजनिक नळ बंद करण्याची मोहीम सुरूच पालिकेकडून सुरूच आहे.

## पत्नीने पतीला लग्नाच्या वाढदिनी किडनी देत जगण्यासाठी दिला आधार

सुराज्य/श्रीपूर

बोरगाव (ता. माळशिरस) येथील राजकुमार काशिनाथ भाग्यवंत यांना त्यांची पत्नी वर्षा भाग्यवंत यांनी लग्नाच्या वाढदिवसा दिवशीच आपली किडनी देत जगण्याचा आधार देण्याचे काम करत समाजासमोर एक आदर्शही ठेवला आहे.

आज समाजात नात्याच्या प्रेमापोटी आई आपल्या मुलाला, मुलगा आपल्या आईला व बहीण आपल्या भावाला शारीरिक अवयव दान देऊन जीवदान दिल्याच्या अनेक घटना आपणास पहावयास मिळत आहे. निसर्गाने आपल्या देहाला महत्वाचे दोन अवयव दिले आहेत. एक जरी अवयव खराब झाला तरी दुसरा अवयावर जगू शकतो. म्हणून बोरगाव मधील वर्षा भाग्यवंत यांनी आपल्या पतीला किडनी दान देऊन त्यांचे प्राण वाचवत संसार सुखाचा करण्याचा प्रयत्न केला आहे. राजकुमार काशिनाथ भाग्यवंत हे अनेक दिवसापासून किडनीच्या आजाराने त्रस्त झाले होते. त्यांना ताबडतोब किडनींचे प्रत्यारोपण करा, अन्यथा जीवितास धोका आहे असा डॉक्टरांनी सल्ला देताच त्यांची पत्नी वर्षा भाग्यवंत यांनी लागलीच आपल्या पतीचे प्राण वाचावे म्हणून स्वतःची किडनी देण्यास तयार झाल्या. सर्व चाचण्या घेऊन



जहांगीर हॉस्पिटल पुणे येथे किडनी प्रत्यारोपण ऑपरेशन यशस्वी झाले. विशेष म्हणजे या भाग्यवंत दापांत्याचा लग्नाचा वाढदिवस त्याच दिवशी होता. वर्षा भाग्यवंत यांनी आपली किडनी देऊन पतीला जीवदान देत व समाजासमोर आदर्श ठेवत वाढदिवस साजरा केला.